**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1164 नाग/2010**

श्री राजेश रामआसरे साहु
360 दर्शन कॉलनी नागपूर
ता. जि. नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राऊत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री एस. जे. मडावी
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय, कारंजा(घा)
ता. कारंजा(घा) जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय, कारंजा(घा) यांचेकडे मौजा मासोद खसरा क्र. 234/2 व 235/2 चा तपशिल 1980 ते 31.3.2010 या कालावधीतील मुळ वारसाचे 7/12 2) फेरफार किंवा वाटणी करतेवेळी दिलेले शपथपत्र 3) वाटणी करतेवेळी सादर केलेले कागदपत्रे इत्यादी माहिती एकुण 11 मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.7.2010 रोजी देण्यात आला असून अपील अंशतः मंजूर करण्यात आले व 7 दिवसात माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अद्यापपर्यंत काहीही माहिती मिळालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 20.5.2010 रोजी (24.5.2010 रोजी) आपण मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती मिळण्याकरीता शासन नियमाप्रमाणे रक्कम खजीना दाखल केल्यानंतर पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी सदरच्या रकमेचा भरणा केला नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सदरचे पत्र त्यांना मिळालेले नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयात मात्र दि. 20.5.2010 च्या पत्राचा उल्लेख आहे. त्यामुळे सदरचे पत्र अपीलकर्ता यांना पाठविण्यात

आलेले आहे असे गृहीत धरावे लागते. परंतू अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. अपीलकर्ता यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहितीच्या पृष्ठांचे विवरण व एकुण अतिरिक्त खर्च व टपाल खर्च हे कळविणे आवश्यक होते व तसे न केल्यामुळेच अपीलकर्ता यांना पत्र मिळाले किंवा नाही. परंतू त्यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा माहिती ही 7 दिवसाचे आंत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांची नुकतीच बदली झालेली आहे व पूर्वीचे माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. आयोगाची नोटिस आल्यानंतर त्यांनी स्वतः कागदपत्राचा शोध घेतला व ती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांचे म्हणणे आहे. परंतू तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे माहितीच्या अर्जावर कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
2) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही **जिल्हाधिकारी वर्धा** यांनी करावयाची असून सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी वर्धा** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.874-875

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1165 नाग/2010**

श्री विनोद अजाबराव दारोकर
रामदेवबाबा वार्ड मु. पो. आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा 442201 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. (स व सु विभाग) आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
() नागपूर वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली
ता. जि. नागपूर वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली
2) श्रीमती एस. व्ही
जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 1.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. आर्वी यांचेकडे अे. जी. पंपाचे नवीन कनेक्शन व इतर पंपाच्या संदर्भात एकुण 7 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसून माहिती मात्र दि. 15.7.2010 रोजी पाठविण्यात आलेली आहे. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की विहित मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी विज जोडणीचा अर्ज हा उपकार्यकारी अभियंता आर्वी उपविभाग यांचे अखत्यारीत असल्यामुळे माहितीचा अर्ज दि. 7.6.2010 ला आर्वी उपविभागाकडे पाठविण्यात आला. परंतू उपविभागीय कार्यालय आर्वी यांच्याकडुन सदर माहिती ही दि. 1.7.2010 ला प्राप्त झाली व दि. 30.6.2010 ला माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री सी. पी. कुमार सेवानिवृत्त झाले. उपकार्यकारी अभियंता आर्वी उपविभाग यांचा अतिरिक्त भार हा आयोगापुढे उपस्थित असलेले उपकार्यकारी अभियंता यांचेकडे सोपविण्यात आला व त्या अनुषंगाने माहिती अधिकारी हे पद जोडण्यात आले. त्यानंतर लगेचच दि. 12.7.2010 ला

अपील हे अपीलीय अधिका–याकडे दाखल झाले व त्यावेळेस माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून ती दि. 15.7.2010 ला माहिती पोस्टाने पाठवून दिली. याचा अर्थ संबंधित उपकार्यकारी अभियंता उपविभाग आर्वी हे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विलंबास जबाबदार आहेत असे दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना संपूर्ण माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना संपूर्ण माहिती दिलेली आहे. परंतू विज जोडणी ज्यांना दिलेली आहे त्यांची यादी दिलेली नाही. ती यादी पुन्हा उपकार्यकारी अभियंता उपविभाग आर्वी यांनी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मुळात अपीलकर्ता यांनी ज्या उपकार्यकारी अभियंता यांचेकडे विज जोडणीचा अर्ज केलेला होता त्यांचेकडेच माहिती मागणे संयुक्तिक होते. परंतू तशी ती न मागता त्यांनी विभागाकडे मागणी केली होती व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास जो विलंब झालेला आहे तो जाणीवपूर्वक झालेला नाही. परंतू सदरची माहिती अपीलकर्ता यांना आयोगा समोर पुरविण्याचा प्रयत्न केला असता अपीलकर्ता यांनी असे सांगितले की माहिती पोस्टाने मागितलेली असल्यामुळे ती त्यांना पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत टपालाने उर्वरीत माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.877-878

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1169 नाग/2010 व अपील क्रमांक 1170 नाग/2010**

श्री निवृत्ती लक्ष्मण पाटील
बी–4, मणी ले आऊट, राणाप्रताप नगर
सिमेंट रोड, जगदीश सभागृहामागे, मंजूषा कॉन्व्हेंट समोर,
गोपाल नगर, नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जयदेव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
लक्ष्मीनगर झोन क्र.1, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर 10
2) जन माहिती अधिकारी तथा करनिर्धारक अधिकारी
लक्ष्मीनगर झोन क्र.1, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर 10 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 6.3.2010 रोजी व दि. 10.2.2010 रोजी माहिती अधिकारी तथा करनिर्धारक अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे घर क्रमांक व भूखंड नंबर देवून तसेच भूखंड क्रमांक व वस्तीचे नाव व अपील नंबर देवून अनुक्रमे एकुण 13 व 14 घरांचे कर आकारणीची माहिती एकुण 7 मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना अनुक्रमे दि. 5.4.2010 व दि. 9.3.2010 रोजी मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अनुक्रमे दि. 30.4.2010 व दि. 15.4.2010 रोजी प्रथम अपीले दाखल केली आहेत. प्रथम अपीलांचे निर्णय अनुक्रमे दि. 15.5.2010 व दि. 29.4.2010 रोजी दिलेले असून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे या कारणास्तव दोन्ही अपीले खारीज करण्यात आलेली आहेत. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू अपूर्ण उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच घर नं. 2424 जुना वार्ड नं. 75 या संदर्भात कर आकारणी योग्य रितीने केलेली नाही. तसेच घरावर तिप्पट कर वाढविला. इतर कोणत्याच घरावर वाढ केली नाही. कर आकारतांना क्षेत्रफळ, ठिकाण, उपयोग व बांधकामाचे वय लक्षात न घेता करात तिपटीने वाढ केली. जुनाच कर आकारावा किंवा त्यात 200 ते 300 रुपयांनी वाढ करावी. मी केव्हाही कर भरण्यास तयार आहे. जोपर्यंत मला न्याय मिळत नाही तोपर्यंत मी कर भरणार नाही. सोबत जेष्ठ नागरीक ओळखपत्राची झेरॉक्स तसेच जुन्या व नव्या डिमांड नोटची झेरॉक्स कॉपीज पाठवित आहे असेही त्यांनी अर्जात नमुद केले असून सुध्दा त्यांना सवलत मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी ज्या घराच्या कर आकारणीची मागणी केली आहे ती त्रयस्थ पक्षाची घरे आहेत व त्यामुळे त्या घरमांलकांना विचारणा केल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. त्यानंतरही त्यांनी काही घरांचे प्लॉट नंबर दिलेले आहेत परंतू कर आकारणी ही घर नंबर प्रमाणे असते व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांच्या घरावर जी कर वाढ झालेली आहे त्या कर वाढीच्या संदर्भामध्ये त्यांची मुख्य तक्रार आहे व ती त्यांनी अर्जामध्ये सुध्दा नमुद केलेली आहे. त्यामुळे त्यांचा अर्जच मुळात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही. तरीही त्यांनी घर नंबर दिल्यास व घरमालकांची परवानगी असल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल.

4. अपीलकर्ता यांनी ज्या घरांचे घर नंबर दिलेले आहेत त्या घरावरील कर आकारणी ही पुरविण्याकरीता घरमालकाच्या परवानगीची आवश्यकता नाही. कर आकारणीचे हे विवरण हे सार्वजनिक अभिलेखे आहेत ती वैयक्तिक माहिती होत नाही. व त्यामुळे संबंधित घरमालकाच्या परवानगीची आवश्यकता नाही. त्यामुळे ज्या घरांचे नंबर दिलेले आहेत त्यांच्या कर आकारणीची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. ज्या प्लॉट नंबर वरील घर नंबर दिलेले नाहीत त्या प्लॉट वरील घर नंबर हे अपीलकर्ता यांनी दिल्यास त्यांना त्या कर आकारणीची माहिती उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना कर आकारणीच्या गुणवत्तेबाबत युक्तीवाद केला. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती जशी आहे तशी कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते. राज्य माहिती आयोग हे न्यायालय नसल्यामुळे कोणत्याही प्रकरणामध्ये गुणवत्तेबाबत चौकशी करण्याचे किंवा आदेश देण्याची तरतुद अधिनियमात नाही. जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते त्या माहितीच्या आधारे स्वतंत्रपणे संबंधित प्राधिकरणातील सक्षम अधिकारी यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक असते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे कर आकारणीच्या संदर्भातील मागणीचा वियार करता येत नाही. त्यावर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्रमांक 1169 नाग/2010 व अपील क्रमांक 1170 नाग/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेल्या घर मालमत्तेचे कर निर्धारणाची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी उर्वरीत प्लॉटचे घर नंबर उपलब्ध करुन दिल्यास त्याबद्यलची सुध्दा कर निर्धारणाची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.880-882

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1173 नाग/2010

श्री फैजान अख्तर व. अब्दुल खालिक
हन्डी ओली, गुजरी बाजार, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त
महा. राज्य परिक्षा परिषद पूणे
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पूणे
2) जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त
आयुक्त
महा. राज्य परिक्षा परिषद पूणे
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पूणे ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.4.2010 रोजी (प्राप्त दि. 27.4.2010) जन माहिती अधिकारी महा. राज्य परिक्षा परिषद पूणे यांचेकडे शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूरचे पत्र दि. 2.3.2010 सुलताना शादिनची डी.एड. गुणपत्रिका तसेच प्रमाणपत्र तपासणीचा अहवाल व दि. 8.2.2010 प्रमाणे दिलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.7.2010 रोजी देण्यात आला असून सुनावणीस हजर झाले नाही त्यामुळे माहिती अधिकारी यांनी जो निर्णय दिला आहे तो योग्य आहे. गुणपत्रक व प्रमाणपत्र तपासणीसाठी एप्रिल 1986 चे रजिस्टर असल्याशिवाय तपासणी करणे शक्य होत नाही. सदर रजिस्टर शोध घवूनही अद्याप मिळू शकलेले नाही. त्यामुळे आपणास तपासणी अहवालाची सत्यप्रत देणे शक्य

होत नाही असे पुन्हा कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये माहिती दिलेली नाही. व मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये जी माहिती दिली ती अपुर्ण आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की रजिस्टरच्या मदतीशिवाय तपासणी अहवाल उपलब्ध करुन देता येत नव्हते ते रजिस्टर आता उपलब्ध झालेले आहे. सदरचे रजिस्टर हे दुस–या एका नस्तीमध्ये सादर झालेले होते व त्यामुळे ते मिळून येत नव्हते. परंतू आता मिळालेले आहे. त्यामुळे तपासणी करुन अहवाल उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता यांच्या मुद्या क्र. 2 मधील नमुद केलेल्या तक्रारीच्या संदर्भात कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसल्यामुळे तसे त्यांना कळविलेले आहे. परंतू आता त्या तक्रारीचा सुध्दा निर्णय देता येईल असे सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 19.4.2010 च्या (प्राप्त दि. 27.4.2010 च्या) अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत पुरविण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.884-885

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1174 नाग/2010**

श्री डी. के. देशपांडे
उपायुक्त (पुनर्वसन)
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (महसूल)
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक
ता. जि. नाशिक
2) श्री एस. ई. दळवी
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार आस्थापना
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक
ता. जि. नाशिक ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2009 रोजी (औरंगाबाद खंडपीठाकडून दि.9.8.2010 हस्तांतर) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 2.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी महसूल विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे प्रकरणाच्या कालावधीपासून ते सन 2004 पर्यंत श्री पृथ्वीराज चव्हाण तहसिलदार रो.ह.यो.नंदुरबार यांनी उपायुक्त विभागीय आयुक्त कार्यालय श्री आर.जी.कुलकर्णी यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानी प्रकरणाची सद्यस्थिती अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना आपण मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. सबब माहिती देता येत नाही असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.11.2009 रोजी देण्यात आला असून सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. व तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. अपीलकर्ता हे स्वतः उपायुक्त (पुनर्वसन) नागपूर विभाग येथे कार्यरत आहेत. पुर्वी ते अमरावती येथे कार्यरत होते. अपीलकर्ता हे नेहमीच माहितीच्या अधिकारात अर्ज करीत असतात. परंतू प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलाच्या सुनावणीस कधीही उपस्थित होत नाही. जी माहिती जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले असल्यावर सुध्दा ते प्रथम अपील करतात व द्वितीय अपील करतात तेव्हा त्यांनी अपीलाचे सुनावणीस माहिति उपलब्ध आहे परंतू दिली जात नाही याबद्यल पुरावा सादर करणे आवश्यक असते तसे ते करीत नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.887-888

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1183 नाग/2010**

श्री पुरुषोत्तम मनोहर देशपांडे
रा. भास्कर भगीरथी अपार्टमेंट
के.ऑफ डॉ. भालेराव, एस–1, बोरकुटे लेआऊट
नरेन्द्र नगर नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. ए. गाले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक
उद्योग सहसंचालक कार्यालय नागपूर
उद्योग भवन, दुसरा मजला, सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री अ. प्र. धर्माधिकारी
जन माहिती अधिकारी तथा उद्योग उपसंचालक,
उद्योग सहसंचालक कार्यालय नागपूर
उद्योग भवन, दुसरा मजला, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी सहसंचालक, उद्योग सहसंचालक यांचे कार्यालयात तसर स्किमच्या अधिकारी, कर्मचारी यांना खादी बोर्डाकडे वर्क करण्याच्या संदर्भामध्ये 1995 ते 1981 या कालावधीत केंद्र शासनाची पूर्व मंजुरी घेतली असल्यास पूर्व मंजुरीची प्रत, शासनाच्या सेवेतून ट्रान्सफर झालेल्यांची ऑर्डर व रिलिव्हींग ऑर्डरची प्रत तसेच समायोजन करण्याची व त्या संदर्भातील इतर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.4.2010 रोजी कोणती कागदपत्रे पाहिजे आहेत याचा निश्चित अर्थबोध होत नसल्यामुळे चर्चे करीता उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. व चर्चेअंती दि. 17.5.2010 रोजी तीन मुद्यांच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 16.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.7.2010 रोजी देण्यात आला असून त्यामध्ये त्यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे मात्र केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेतली होती किंवा नाही त्या संदर्भात

कागदपत्रे उपलब्ध नाहीत हे त्यांना पूर्वीच कळविलेले आहे. या कारणास्तव सदरचे अपील खारीज केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 6.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यानंतर सुध्दा दि. 30.7.2010 रोजी कार्यालयातील संपूर्ण अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन दिले होते व त्यातूनही आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगास सांगितले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरचे आदेश हे काढलेलेच नाही परंतू तसे असेल तर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सदरची माहिती उपलब्ध होवू शकणार नाही. जी कागदपत्रे उपलब्ध आहेत तीच कागदपत्राच्या स्वरुपात त्यांच्या छायांकित प्रति उपलब्ध होतात. परंतू जी माहिती अस्तित्वातच नाही त्याबद्यल आयोगास कोणत्याही प्रकारचे कार्यवाही करण्याचे आदेश देता येत नाही. राज्य माहिती आयोग हे न्यायालय नाही. तसेच अपीलकर्ता यांनी अभिलेखाची सुध्दा तपासणी केलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.890-891

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1185 नाग/2010**

श्री कुंदनलाल मणिराम प्रजापति
श्रंजन बिछायत केंन्द्र, हंसापूरी,
धोंडबा चौक नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ, आर.टी.ओ.समोर, नागपूर
2) श्री आर. आर. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ, आर.टी.ओ.समोर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी सहाय्यक संचालक तथा उपाध्यक्ष अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांचे कार्यालयात माहिती अधिकारी यांना पत्र दि. 7.4.2010 च्या अनुषंगाने श्रीमती बिल्किश शेंख इब्राहिम स.शि. निराला विद्यालय हंसापूरी नागपूर पोलीस दक्षता विभागाकडे दिलेल्या पकरणात काय कार्यवाही झाली याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 23.6.2010 रोजी वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. तत्वूर्वी अपीलकर्ता यांनी दि. 22.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जोपर्यंत चौकशी होत नाही व संबंधित शिक्षिका हया पोलीस यांना सहकार्य करीत नाही तोपर्यंत माहिती मिळत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की

पोलीस दक्षता पथकाकडून माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. दक्षता पथकाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कार्यवाहीचा अहवाल अपीलकर्ता यांना देता येईल असे सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. मात्र अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील माहिती अधिकारी हे प्रत्येक अर्जाच्या संदर्भात प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागितली आहे अशा प्रकारचे उत्तर अर्जदारास देतात ते बरोबर नाही. समितीच्या कार्यालयातील अधिका–यांना प्रश्न कसा असतो याचे ज्ञान दिसून येत नाही. यापुढे अशा प्रकारचे उत्तर दिलेले आढळल्यास त्यांना रु. 25 हजाराची शास्ती लादण्यात येईल याची माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नोंद घ्यावी. सदरच्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी कार्यवाहीची माहिती मागितली आहे. कार्यवाहीची माहिती मागणे हा प्रश्न होत नाही. कोणत्याही प्रकरणातील कार्यवाही ही कागदावर उतरवून काढलेली असते व त्या कागदपत्राच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. एवढे सामान्य ज्ञान जन माहिती अधिकारी यांना नाही तसेच कोणत्याही समितीतील अधिका–यांस दिसून येत नाही. त्यांनी एकच परिच्छेद पाठ करुन ठेवलेला आहे व तोच प्रत्येक अर्जदारास ते लेखी देत असतात. सदरच्या प्रकरणात पोलीस दक्षता पथकाकडून अहवाल आलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.893-894

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1186 नाग/2010**

श्री शाम रामचंद्र मेश्राम
ठंदोरा बुध्द विहाराजवळ, नागपूर
पो. बेझानबाग ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.3
नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री हटेकर
जन माहिती अधिकारी
नगर भूमापन अधिकारी क्र.3
नागपूर
ता. जि. नागपूर .... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 3.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर भूमापन अधिकारी यांचेकडे मौजा जरीपटका खसरा क्रमांक 7/1, 9 व 16 मधील फेरफार नं. 187, 188 व 189 चे दस्तऐवज व फेरफाराची कागदपत्रे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.6.2010 रोजी प्रथम अपील उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की ज्या कागदपत्राच्या आधारे फेरफार झाला ती कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की फेरफाराचे नोंदी असलेली 7/12 उपलब्ध आहेत. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या शेत जमिनीच्या संदर्भामध्ये गेल्या 20–25 वर्षापासून सर्व स्तरावर अर्ज व अपीले दाखल झालेली आहेत व अद्याप आयुक्त स्तरावर

प्रलंबित आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या फेरफार नस्तीचा शोध हा सर्व स्तरावर करण्यात आला. तहसिल कार्यालय भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, आयुक्त कार्यालय या सर्वांकडे शोध घेण्यात आला. परंतू फेरफार घेतलेल्या कागदपत्राची नस्ती आढळुन येत नाही. त्यामुळेच प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही कारण अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केले होते व प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिक्षक भूमि अभिलेख आहेत व त्यांचेकडून ते हस्तांतर झालेले आहे परंतू निर्णय झालेला नाही. असे असल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेणे संयुक्तिक राहिल. व त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश देण्याऐवजी सदरच्या माहितीचा सर्व स्तरावर पुन्हा शोध घेण्यात येवून ती माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी भूमापन यांना नोटिस काढून सुनावणी घेवून सुनावणीमध्ये माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा व तसे तपशिलामध्ये अपीलकर्ता यांना कळवावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.896-897

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1196 नाग/2010**

श्री संजय वामन पेटारे
एम.आय.जी.25/4, भामटी परसोडी हाऊसिंग बोर्ड कॉलनी
त्रिमुर्ती नगर नागपूर
ता. जि. नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीश जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जे. टी. रघुवंशी
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे दि.19.1.2009 च्या पत्रावर काय कार्यवाही करण्यात आली याची सविस्तर माहिती देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. या पत्राची पोच पावती माझ्याकडे आहे. मंडळास ताबडतोब कार्यवाही करणे सोपी व्हावे या करिता या पत्राची एक छायांकित प्रत सोबत सादर केली आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.4.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दि. 21.4.2010 अन्वये सर्व मुद्यांवर उत्तर देण्यात आले आहे. व त्यामुळे प्रथम अपील प्रकरण नस्तीबध्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की माहिती ही प्राप्त झाली परंतू विलंबाने प्राप्त झाली व चुकीची प्राप्त झाली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी कोणतीही तक्रार केलेली नाही. परंतू अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की प्रथम अपील दाखल केल्यानंतर माहिती उपलब्ध झाली मात्र प्रथम अपीलाची सुनावणी ही त्यानंतर घेण्यात आली व सुनावणीस हजर राहू शकलो नाही म्हणून त्यातही त्यांचे म्हणणे मांडता आले नाही. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती मागण्यापेक्षा कार्यवाही चुकीची केलेली आहे असे नमूद केलेले आहे. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005

च्या तरतुदीप्रमाणे माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिली जाते. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. व आयोगाने गुणवत्तेच्या बाबत हस्तक्षेप करणे हे योग्य नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही हे निर्विवाद आहे. त्याबद्यल त्यांना विचारले असता त्यांनी कोणत्याही प्रकारचे स्पष्टिकरण दिलेले नाही. अपीलकर्ता यांचा दि. 19.1.2009 चा अर्ज हा तक्रार अर्ज किंवा पत्रात माहिती मागण्याचा अर्ज नाही. तरी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.1.2010 च्या उत्तरामध्ये त्यास माहितीचा अर्ज असे संबोधित केले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी तक्रार अर्ज किंवा पत्र व माहितीचा अर्ज यातील फरक कळत नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे विवरण आयोगापुढे सादर केले आहे त्याची प्रत ही प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेली आहे. व त्या अनुषंगाने योग्य तो निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून देणे संयुक्तिक राहिल. मात्र जन माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने दिलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक अपीलकर्ता यांच्या दि. 1.2.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने 30 दिवसाचे आंत अधिनियमाच्या कलम 7 (1) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.899-900

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1195 नाग/2010

श्री उमाशंकर प्र. नामदेव
क्लम–केशव प्लाजा, 7,रामदासपेठ नागपूर
ता. जि. नागपूर 12 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री भी. म. कौसक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक
माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर अमरावती विभाग
जुने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री चंद्रकांत क्षिरसागर
जन माहिती अधिकारी माहिती
माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर अमरावती विभाग
जुने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी माहिती व जनसंपर्क संचालनालय, नागपूर अमरावती विभाग यांचेकडे 1 एप्रिल 09 ते 31 मार्च 10पर्यंत दै. वृत्तपत्रांना देण्यात आलेल्या जाहिराती विषयी /तपशिल. दै.आर्वी टाईम्स, दै.लोकसत्ता, दै. महाविदर्भ, दै.महासागर, दै.संदेश आनंद, दै.शिवसाता, दै.नवप्रभात सोरप दै.महाविदर्भ, दै.लोकसेवा, दै.नागपूर समाचार दै.विदर्भ की बात, दै.नेशनल संदेश या सर्व वरील वृत्तपत्रांना मागील वर्षात 09–10 मध्ये किती जाहिराती व निविदा दिल्या आणि किती से.मि. यांच्या सर्व जाहिराती पुरावे मा.संचालक महोदय यांचेतर्फे देण्यात आलेल्या आदेश प्रत पुरावासह प्रमाणित करुन देण्यात यावी. इत्यादी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 4.5.2010 रोजी संपूर्ण कागदपत्राच्या पृष्ठांची संख्या 4804 असून प्रति पृष्ठ 2 रु. प्रमाणे एकूण रु. 9608/– जमा करण्यात यावे असे यु.पी.एस.द्वारे कळविण्यात आलेले असून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 15.6.2010 रोजी देण्यात आला असून दि.4.5.2010

रोजीच्या पत्रान्वये रु. 9608/— जमा करण्यासंबंधात पोस्टाद्वारे यु.पी.एस.द्वारे पत्र पाठविण्याची कार्यवाही पूर्ण केलेली आहे व त्यानंतर अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की रु. 9608/— जमा करण्या संबंधाचे पत्र मिळाले नाही परंतू दुस—या अर्जामध्ये रु. 568/— जमा करण्या संबंधाचे एक पत्र मिळाले. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की दोन्ही पत्रे यु.पी.एस.द्वारे पाठविण्यात आलेली होती. कमी खर्चाचे पत्र त्यांना मिळाले परंतू रु. 9608/— खर्चाचे पत्र त्यांना मिळत नाही असे त्यांनी प्रथम अपीलात सांगितले. परंतू त्यांचे म्हणणे योग्य वाटत नाही. प्रथम अपीलाच्या सुनावणीत सुध्दा त्यांना या संपूर्ण पत्राच्या बाबतची माहिती दिलेली आहे. यु.पी.एस.चा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला आहे. व त्यावरुन अपीलकर्ता यांना पत्र निर्गमित करण्यात आलेली आहेत हे सिध्द होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कार्यवाही झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी रु. 9608/— चा भरणा करणे संयुक्तिक राहिल. व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.902-903

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1197 नाग/2010 व अपील क्रमांक 1198 नाग/2010**

श्री टेकचंद वेडामल मोटवाणी
रा. साईनगर बुलबुल निवास आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा 442201 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एम. चापले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (बांधकाम)
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री एस. बी. कु–हेकर
जन माहिती अधिकारी उपविभागीय अभियंता
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 4.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1197 नाग/2010 व अपील क्रमांक 1198 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 10.5.2010 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (बांधकाम) यांचेकडे शाखा अभियंता प्रमोद चाफले यांच्या कालावधीतील माहिती एकुण तीन मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. तसेच दि.4.5.2010 रोजी आर्वी या उपविभागातील रस्ता खडीकरण व सिमेंट रोडच्या एकूण कामाची यादी शेडयुल बि व एस्टिमेटची प्रत मागितलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 18.6.2010 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. दोन्ही प्रथम अपीलाचे निर्णय दिलेले दिसून येत नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचे

अनुक्रमे दि. 10.5.2010 व 4.5.2010 रोजी अर्ज प्राप्त झाल्यानंतर श्री पी. एन. चाफले शाखा अभियंता यांना अनुक्रमे दि. 18.5.2010 व 4.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्रे दिलीत व अर्जाच्या प्रति दिल्यात. परंतू श्री चाफले यांनी अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्याकरीता कोणतीही माहिती दिली नाही. व त्यामुळे प्रथम अपील दाखल केल्यानंतर सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री चाफले यांना दि.23.6.2010 रोजी माहिती पुरविण्याकरीता उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिले. परंतू त्यानंतरही त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र अपीलकर्ता यांना दोन्ही अर्जाच्या संदर्भात दि. 30.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी पत्रे दाखल केलेली आहेत.

4. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती शाखा अभियंता श्री पी. एन. चाफले यांचे संबंधात असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी पत्र दिल्यावर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आदेश दिल्यावर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतू राज्य माहिती आयोग खंडपीठाची नोटिस द्वितीय अपीलाच्या सुनावणीकरीता दि. 20.8.2010 रोजी निर्गमीत केल्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 30.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन आयोगापुढील सुनावणीच्या पूर्वी माहिती दिल्याचे दाखविण्याकरीता तातडीने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पत्रे दिलेली असल्यामुळे शाखा अभियंता श्री पी. एन. चाफले यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला दिसून येतो. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (4) अन्वये जन माहिती अधिकारी यांना माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसेल तर इतर अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेता येते. व त्याप्रमाणे त्यांनी श्री चाफले यांना पत्रे दिलेली आहेत व अशा सहाय्य घेतलेल्या अधिका–यास अधिनियमाच्या कलम 5 (5) अन्वये जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत झालेले आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अनुक्रमे दि. 10.5.2010 व 4.5.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसात शाखा अभियंता श्री पी. एन. चाफले (deemed) यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पुरविण्यात आलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. व अधिनियमाच्या कलम 20 (1) परंतूकाप्रमाणे त्यांचे म्हणणे एकून घेतले व ते समाधानकारक नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये प्रत्येक अपीलामध्ये रु. 15000/– असे

एकुण रु. 30000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग वर्धा** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.895-897

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1106 औरं/2010**

श्री रामकृष्ण भगवान बागुळ
श्रीकृष्ण कॉलनी मु. पो. अंमळनेर
ता. अंमळनेर जि. जळगाव ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय अंमळनेर
ता. अंमळनेर जि. जळगाव
2) जन माहिती अधिकारी तथा अभियंता
नगर परिषद कार्यालय अंमळनेर
ता. अंमळनेर जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 25.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा अभियंता यांनी माहिती पुरविलेली आहे. दि. 6.3.2010 रोजी दाखल केलेले अपील मागे घेत आहे असे अपीलकर्ता यांनी लेखी कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

1) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.909-

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1107 औरं/2010**

श्री भोजराज भिला बाविस्कर
ह.मु.भोईटेनगर प्लॉट नं. 32 रेल्वेगेट जवळ
जळगाव ता. जि. जळगाव ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री किशोर दत्ताजीराव शिंदे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती अंमळनेर
ता. अंमळनेर जि. जळगाव
2) श्री सुनिल पांडुरंग पाटी
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत पिंपळी
ता. अंमळनेर जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 25.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झाली पुढील सुनावणीची आवश्यकता नाही त्यांचा अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येते.

1) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.911-

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1085 औरं/2010**

श्री देविदास हुना पाटील
प्लॉट नं. 50 गट नं.434/1 गणपती नगर जळगाव
ता. जि. जळगाव ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. संचालक
जवळगाव शहर महानगर पालिका, जळगाव
ता. जि. जळगाव
2) श्री देविदास एच. पाटील
जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार
जवळगाव शहर महानगर पालिका, जळगाव
ता. जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.8.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.4.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 24.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी आवश्यक असलेली माहिती मिळाली पुढील तारखेची आवश्यकता नाही असे सांगितलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

1) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.913-

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अपील क्र. 1209 नाग/2010 व अपील क्र. 1210 नाग/2010**

श्री सैय्यद मो. अली शेर अली
गांधी चौक मच्छिसाथ कन्हान–पिपरी
ता. पारशिवनी जि. 441401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर
2) श्री सी. ए. भंगारे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत कन्हान–पिपरी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1209 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 14.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत कन्हान–पिपरी मे. अवतार इंटर प्राईज मुंबई यांस मालमत्ता मोजमापाच्या संदर्भामध्ये अधिका–याने दिलेल्या निर्देशासंबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 15.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे खंड विकास अधिकारी यांनी आदेश दिलेले दिसून येतात. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की आतापर्यंत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की

अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाला परंतू त्यांचे कार्यालयामध्ये अनेक शाखा असल्यामुळे त्या शाखेमधून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून पुरविता आले नाही. परंतू त्यांनी शाखेतील कर्मचा–यांना पत्र दिल्याचा पुरावा सादर केला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा माहिती दिलेली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या संदर्भात त्यांचे म्हणणे एकुन घेण्यात आले. परंतू पुन्हा शाखेनी माहिती दिली नाही म्हणून पुरविता आली नाही असे सांगितले. शाखा ही त्यांच्या अधिकार कक्षेत आहे व दि. 14.5.2010 ते 2.9.2010पर्यंत शाखेकडून माहिती प्राप्त होत नाही हे उत्तर समाधानकारक नाही व त्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 500/–ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1210 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 24.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत कन्हान–पिपरी यांचेकडे जानेवरी 2009 ते एप्रिल 2010 या कालावधित किती अर्जदारांना किती दिवस व किती मंजुरी दिली. काम मिळालेल्या बेरोजगार कामगारांची नाव, पत्त्या सहीत. तसेच ज्यांचे जॉब कार्ड बनले असुन त्यांना काम मिळाले नाही त्या जॉब कार्ड धारकांना बेराजगारी भत्ता दिले जात असेल तर तशी माहिती पुराव्यासह पुरविण्यात यावी. नाव पत्त्या सहीत. सदरची माहिती विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्याबाबतची माहिती ही शाखेकडून उपलब्ध झालेली नाही. परंतू त्यांनी दि. 2.9.2010 रोजी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जी माहिती एका पृष्ठामध्ये आहे ती माहिती उपलब्ध करुन देण्यास 3 महिन्याचा कालावधी लागावा ही माहिती देण्याचे टाळाटाळ करण्याचा प्रयत्न दिसून येतो. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या संदर्भात त्यांचे म्हणणे एकुन घेण्यात आले. परंतू पुन्हा शाखेनी माहिती दिली नाही म्हणून पुरविता आली नाही असे सांगितले. परंतू त्यांनी शाखेतील कर्मचा–यांना पत्र दिल्याचा पुरावा सादर केला नाही. व त्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 500/–ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 1209 नाग/2010 व अपील क्र. 1210 नाग/2010 हे मंजुर करण्यात येते अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 14.5.2010 व दि. 24.5.2010 रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 14.5.2010 व दि. 24.5.2010 रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने 30 दिवसामध्ये अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रत्येकी रु. 500/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.914-916

जा.क्र.---------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1213 नाग/2010**

श्री राजेंद्र पंजाबराव ठाकरे
अेनर्जी मॅनेजमेंट, प्लॉट नं. 38
जगन्नाथबाबानगर ता. जि. चंद्रपूर 442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
एम.एस.ई.डी.कं.लि. डिव्हीजन वरोरा
जवळ 220 के.व्ही. एस/एस एम.एस.ई.बी. नागपूर रोड,
पो. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री मोटघरे
जन माहिती अधिकारी
के.ऑफ सहाय्यक अभियंता (ओ)
एम.एस.ई.डी.कं.लि. डिव्हीजन वरोरा
जवळ 220 के.व्ही. एस/एस एम.एस.ई.बी. नागपूर रोड,
पो. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे नंतर सायंकाळी 5.00 वाजता हजर झाले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता एम.एस.ई. डी.कं.लि. डिव्हीजन वरोरा यांचेकडे Information regarding short Tender Notice published in daily "Mahavidarbha" dt 21.12.2009 (Local Paper) (Total 14 Numbers of tenders) The last date of Submission of tenders was 31.12.2009 यातील माहिती मागितलेली दिसून येते. सोबत स्वतःचा पत्ता लिहिलेला रु. 15 चे तिकिट लावलेले पाकिट पाठविलेले दिसून येते. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती दिली नाही व प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहितीच्या अर्जाप्रमाणे त्यांना काहीही कळविलेले नाही परंतू प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही मात्र टेंडर रद्य केले असे कळविले. ही बाब जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकाराच्या संदर्भात कळवू शकले असते. आजही जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर नाहीत व त्यांनी आयोगास तसे काहीही कळवले नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दोषी आढळुन येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे व

त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतुकाप्रमाणे शास्ती बद्यलचे त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे बंधनकारक आहे जन माहिती अधिकारी उशीरा उपस्थित झाल्यानंतर त्यांचे म्हणणे एकुन घेतले परंतू त्यांचे म्हणणे समाधानकारक नाही त्यामुळे रु. 5000/– ची शास्ती लादणे संयुक्तिक राहिल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टानी माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 25.5.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **अधिक्षक अभियंता एम.एस.ई.डी.कं.लि. चंद्रपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.918-919

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1215 नाग/2010**

श्रीमती यशोधरा विश्वनाथ सहारे
मु. मालदुगी पो. गोठणगांव
ता. कुरखेडा जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक
महिला आर्थिक विकास महामंडळ, (माविम) मुख्यालय मुंबई
ता. जि. मुंबई
2) जन माहिती अधिकारी
महिला आर्थिक विकास महामंडळ, (माविम)
जिल्हा कार्यालय गडचिरोली ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 6.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2009 रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने द्वितीय अपीलाची सुनावणी होवून निर्णय झालेला आहे. परंतू माहिती पूर्ण मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी पुन्हा माहितीचा अर्ज व प्रथम अपील तेच ठेवून पुन्हा द्वितीय अपील दाखल केले. त्या अर्जाच्या अनुषंगाने निर्णय झालेला आहे परंतू अर्जाच्या अनुषंगाने पुन्हा द्वितीय अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देता येत नाही. तसेच आता दाखल केलेले द्वितीय अपील हे मुदतबाहय सुध्दा आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.921-

जा.क्र.---------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1219 नाग/2010**

श्री गोविंदा सितारामजी बावनकर
सरस्ती शिशु मंदीर, पिंडकेपार रोड
पोस्टमेन चौक बाजपाई वार्ड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांनी संप असल्यामुळे कार्यालयात थांबावे लागेल आयोगापुढे उपस्थित राहता येणार नाही अशी विनंती केलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे एकुन घेतलेले आहे व त्याप्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेला आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय गोंदिया यांचेकडे दि. 1.1.2006 ची वेतन पडताळणी होणे बाबत मुळ सेवापुस्तकातील जोडपत्र चालू जोडपत्र 1 आपणाकडे पाठविण्यात आले होते. दि. 31.12.2006 रोजी मी सेवानिवृत्त झालो. सुधारीत वेतनश्रेणी लागू झाली नाही व निवृत्ती वेतन मिळाले नाही त्याबद्यलची माहिती प्रत्यक्ष उपलब्ध करुन देणे. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.5.2010 रोजी आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. तरी आपण स्वतः या कार्यालयात उपस्थित राहून खुलासा करावा जेणेकरुन विहित कालावधीत माहिती पुरविणे शक्य होईल असे कळविण्यात आले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 14.6.2010 रोजी स्पष्टीकरण सादर केलेले आहे. त्यामध्ये कृपया मुळ सेवापुस्तक पडताळणी मुदतीच्या आत व्हावयास पाहिजे असे स्पष्टीकरणात म्हटलेले आहे. परंतू दि. 2.7.2010 रोजी सदरची बाब माहिती अधिकार नियम अंतर्गत येत नसल्याने आपला अर्ज नस्ती करण्यात येते याची कृपया नोंद घ्यावी असे अपिलकर्त्यास कळविण्यात आलेले आहे असे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने दि. 21.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू सदरचे प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांना हस्तांतर केले. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की लेखा अधिकारी वेतन पडताळणी पथक यांचेकडून तहसिल कार्यालयामध्ये मुळ सेवापुस्तक प्राप्त झालेले आहे अशी त्यांची माहिती आहे परंतू त्याबाबतची पुढील कार्यवाही झालेली नसल्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी कार्यवाही करुन जरी माहिती मागितलेली असली तरी त्यांच्या मुळ सेवापुस्तकाच्या संदर्भात वेतन पडताळणी करुन सुधारीत वेतनश्रेणी लागू होईल यांची त्यांना अपेक्षा असल्यामुळेच व ती आतापर्यंत झालेली नसल्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागितलेली नाही असे म्हणण्यापेक्षा त्याबाबतची वस्तुस्थिती त्यांना कळविणे आवश्यक राहिल. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय व माहिती उपलब्ध करुन देणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत प्रक्रिया करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी तसे न केल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करावी लागेल.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.923-924

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1218 नाग/2010**

श्री प्रकाश रामदेव जयस्वाल
जय बम्लेश्वरी कंपाऊंड, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ
आमगाव रोड, फुलचुर रोड,
गोंदिया ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. जी. बारापात्रे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
पाटबंधारे विभाग गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री बिराजदार
जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
पाटबंधारे विभाग गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पाटबंधारे विभाग गोंदिया यांचेकडे 16.6.2009 च्या तक्रार अर्जाच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती. तसेच एकुण 4 मुद्यांवर गणेश नगर नाल्याच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोस्टने घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. 24.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाच्या संदर्भात रु. 152/— चा भरणा करावा व मुद्या क्र. 4 ची काही माहिती तसेच मुद्या क्र. 2 व 3 बाबत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घ्यावी. असे कळविलेले दिसून येते. खर्चाचा भरणा केल्यावर दि. 19.7.2010 रोजी मागितलेली माहिती सहपत्राची प्रत व पुररेषाचा नकाशा सोबत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात आलेला आहे असे दिसते. परंतू मागितलेली माहिती वेळेत दिली नाही तसेच अपूर्ण व दिशाभूल करुन दिली त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती सहाय्यक अभियंता श्रेणी 1 पाटबंधारे विभाग गोंदिया यांचेकडे होती म्हणून त्यांना दि. 6.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले. व पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिली. त्यांचेकडून माहिती उपलब्ध झाल्यावर दि. 24.6.2010 रोजी खर्चाचा भरणा कळविण्यात आला व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांना हीच माहिती दि.2.7.2009 रोजी सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. तेव्हा सुध्दा अपीलकर्ता यांनी गणेश नगर जवळच्या नाल्यावरील पुररेषा आखणी चुकीची केली असल्याचे नमूद केलेले आहे. परंतू सदर पुररेषा आखणी ही संबंधित महसूल खात्याच्या पटवारी, राजस्व निरीक्षक, नायब तहसिलदार यांनी प्रत्यक्ष उपलब्ध करुन दिलेल्या नकाशा व माहिती तसेच स्थानिक चौकशी करुनच देण्यात आलेली आहे. पुररेषा आखणी करण्याकरीता हे कार्यालय जबाबदार नाही. तरी याबाबत आपण महसूल विभागातील संबंधित कार्यालयांशी संपर्क साधुन पाठपुरावा करावा तसेच गोंदिया जिल्हयात या अगोदर मागील 50 ते 100 वर्षात 2005 ची पुरपरिस्थीती निर्माण झालीच नव्हती त्यामुळे 100 वर्षातील पुराबाबतची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. पुररेषा आखणीबाबत मात्र महसूल विभागाशी संपर्क साधुन माहिती घ्यावी असे कळविलेले दिसून येते. हे कळविलेले असून सुध्दा अपीलकर्ता तीच माहिती पुन्हा पुन्हा मागत आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. सहाय्यक अभियंता श्रेणी 1 पाटबंधारे विभाग यांनी पण खुलासा केलेला आहे व त्यामध्ये सदरच्या कामाच्या आवश्यकतेप्रमाणे पाटबंधारे उपविभाग गोंदिया अंतर्गत शाखा क्रमांक 2 कडून सदरील काम करण्यात आले. व नगर रचनाकार विकास योजना यांनी केलेल्या मागणी प्रमाणे पांगोली नदी नाले चे महत्तम पुररेषा दर्शविणा—या नकाशांची प्रत दि. 25.11.05 प्रमाणे विभागास सादर करण्यात आले. हीच माहिती दि. 18.9.2008 रोजी मागण्यात आली होती. शाखा क्रमांक 2 यांनी क्षेत्रीय स्तरावर पुररेषा आखण्याचे कार्यवाही केलेली असल्या कारणी त्यांना माहिती मागण्यात आली. सदर काम हे नियमित काम नसुन मागणी प्रमाणे करुन देण्यात आले. त्या कारणी सदरील कामाची माहिती शाखेकडे उपलब्ध नसल्याचे शाखेच्या पत्र क्र.167 दि.17.10.08 प्रमाणे कळविले. तसेच दि. 11.11.08 प्रमाणे सादर करण्यात आले. सदर माहिती उपविभागाच्या नियमित कामाबाबत नाही. तसेच नकाशे किंवा सखोल माहिती उपलब्ध नाही. वर्ष 2005 साली कार्यरत शाखा अभियंता व कर्मचारी ज्यांनी पुररेषा संबंधी क्षेत्रीय स्तरावर काम पाहिले त्यांच्याशी चर्चा अंती माहिती उपविभागाचे पत्र दि. 1.6.10 प्रमाणे विभागास सादर करण्यात आले. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांना कार्यवाही करुन पाहिजे असल्यास ती जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे करुन घेणे संयुक्तिक राहिल. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.926-927

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1220 नाग/2010**

श्री संतोष वासुदेव बुकावन
ताडगाव कॉलनी रोड, सिव्हील लाईन
मु. पो. अर्जुनी/मोरगाव ता. अर्जुनी/मोरगाव
जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री बी. एस. मोहबरे
जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. IPHS अंतर्गत निवड झालेल्या 19 प्रा.स्वा.केंद्राची नावे
2. Magnetic water conditioner खरेदी करणा–या प्रा.स्वा.केंद्राची नावे
3. Magnetic water conditioner खरेदी करणा–या अधिका–यांचा हुद्या
4. या खरेदीसाठी प्राप्त निविदांचया प्रती व वृत्तपत्रातील जाहिरातीच्या साक्षांकित प्रती
5. बिल मंजूर आदेशांच्या प्रती, मंजूर देयकाच्या साक्षांकित प्रती, प्रत्येक प्रा.स्वा.केंद्रातून प्राप्त धनादेशाचे क्रमांक, रक्कम व दिनांक.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने माहिती

उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 14.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील केल्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 22.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.6.2010 रोजी देण्यात आला असून दि. 22.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तांत्रिक अडचणीमुळे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांचेकडून विलंब झालेला आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की त्यांना 4 मुद्यांची माहिती मिळाली परंतू 1 मुद्याची माहिती अद्यापही मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 4.5.2010 ला प्राप्त झाल्या नंतर डॉ. गाडेकर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांचेकडे पाठविण्यात आला. त्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगाकडे दिलेला आहे. व जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांनी पुन्हा सदरची माहिती तालुका स्वास्थ केंद्र यांचेकडे मुद्या क्र. 5 च्या संदर्भामध्ये मिळण्याकरीता पाठविलेली होती. वास्तविक प्रत्येक तालुका स्वास्थ केंद्र हे स्वतः स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण असून त्यांचेकडे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती दिलेली आहे. परंतू त्यांनी ती दिलेली नाही. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध नसते तर ती वेगवेगळया शाखांकडे उपलब्ध असते. व त्यामुळे एकुण 10 टी एम ओ करीता खरेदीच्या बिलाची माहिती ही त्यांना परस्पर कळविण्यास जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापकानी सांगितलेले होते परंतू ती मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळेच विलंब झालेला आहे. परंतू ती टी एम ओ कडे उपलब्ध होवू शकेल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत संबंधित टी एम ओ यांचेकडून माहिती संकलित करुन ती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 व्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांना अर्जाचे हस्तांतर केले व जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांनी संबंधित माहिती ही तालुका स्वास्थ केंद्र यांचेकडे असल्यामुळे त्यांना पत्रे दिली परंतू त्यामुळे माहिती प्राप्त झालेली

नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यामुळे संबंधित तालुका स्वास्थ केंद्रातील माहिती अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांनी अधिनियमाच्या कलम 5 (4) प्रमाणे घेतले असल्यामुळे संबंधित तालुका स्वास्थ केंद्राचे अधिकारी यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. शिस्तभंगाची कार्यवाही ही जबाबदारी निश्चित करुन करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.929-931

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1217 नाग/2010

श्री अरुण चंपतराव खडतकर
संत तुकडोजी महाविद्यालया मागे, वार्ड क्र.10
प्रताप नगर वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
(ग्राम पंचायत विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 7.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) कार्यालय यांचेकडे दि. 25.5.2009 ला देयक सादर रक्कम रु. 9561/— बदली प्रवासभत्ता देयकाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 6.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता याच्या दि. 31.3.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.933-934

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1229 नाग/2010**

श्री मनोहर पांडुरंगजी बुटे
मु. पो. सेलू (न्यायालयासमोर)
ता. सेलू जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक
उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री साहारे
जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचेतर्फे त्यांचे प्रतिनिधी हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग कार्यालय, नागपूर यांचेकडे 1. रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट येथे नवनियुक्त प्रबंधक श्री सुशांत के. मस्के यांना मान्यता देण्यात आली आहे काय? दिली असेल तर केव्हा व कोणत्या तारखेपासून दिली आहे. याची लेखी माहिती मिळावी. 2. रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट यांना आपण दि. 25.3.2010 चे पत्र क्रमांक 1728 नुसार अहवाल मागितला आहे काय? मागितला असल्यास त्याची सत्यप्रत कॉपी देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.4.2010 रोजी मुद्या क्र. 1 व 2 संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 24.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांनी श्री व्ही. व्ही. बेताल यांना प्रतिनिधी म्हणून पाठविलेले आहे. परंतू प्रतिनिधी यांना परवानगी नाकारण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना मुद्दा क्र. 1 रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट येथे नवनियुक्त प्रबंधक यांना या कार्यालयातर्फे मान्यता देण्यात आली नाही व अहवाल अप्राप्त आहे अशी स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा हजर राहू शकत नाही असे त्यांनी कळविले. राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा हजर नसून त्यांनी प्रतिनिधी पाठविलेले आहे. सदरचे श्री बेताल हे ब–याच अर्जदाराच्या सोबत येत असतात. अपीलकर्ता यांच्या सोबत त्यांना मदत म्हणून प्रतिनिधीस परवानगी देता येते. परंतू अपीलकर्ता यांनी समोर यायचे नाही व श्री बेताल यांना पाठवायचे यावरुन श्री बेताल यांचा व्यवसाय दिसून येतो. व त्यामुळेच त्यांना परवानगी नाकारण्यात आलेली आहे. उपलब्ध करुन दिलेली माहिती स्वयंस्पष्ट असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.936-937

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1230 नाग/2010**

श्री अन्साकलहक वल्द मोहोम्मद मतलूब
प्लॉट नं. 88, म.न.पा.घर क्र. 681, वार्ड नं.52
अन्सास नगर नागपूर
ता. जि. नागपूर 18 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
संतरंजीपूरा झोन क्र. 7, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धाकर
संतरंजीपूरा झोन क्र. 7, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांचेकडे वार्ड नं.52 मधील घर क्र. 681 प्लॉट नं. 881 व घर क्र. 369/88/अे (प्लॉट नं. 88अे) हे दोन्ही घर एकमेकाला लागुन आहे किंवा नाही तसेच या दोन्ही घराचे घर मालक एकमेकाच्या शेजारी आहे किंवा नाही अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.5.2010 रोजी आपण माहितीचा अधिकार अन्वये मागितलेली माहिती आपल्याला दिनांक 13.4.2010 रोजी दिलेली आहे. अतिरिक्त माहिती लागत असल्यास आपण नस्तीची सत्यप्रत घेवू शकता असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.6.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा अर्ज (झोनल ऑफिसर (आरोग्य)झोन क्र. 7) यांच्याकडे अर्जात नमुद केलेला मुद्याची माहिती पुरविण्यास्तव पाठविण्यात यावा संबंधित अधिका-यांनी विनामुल्य अपील सदर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मोका चौकशी अहवाल प्राप्त व त्यानंतर अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दयावी असा माहिती अधिकार अधिनियमामध्ये कुठेही उल्लेख नाही त्यामुळे सदर बाब नामंजुर करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी दि. 22.4.2010 रोजी माहितीचा अर्ज सादर केला व माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 26.5.2010 रोजी प्रथम अपील

दाखल केले. परंतू जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास जे उत्तर दिलेले आहे तीच माहिती पूर्वी जरी दिलेली असली तरी ते स्वयंस्पष्ट नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयामध्ये दि. 12.3.2010 च्या अर्जाचा उल्लेख केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांना हेही माहिती नाही की दि. 26.5.2010 चे अपील हे दि. 22.4. 2010 च्या अर्जाच्या संदर्भात आहे. व त्यामुळे त्यांनी अपीलाच्या निर्णयामध्ये असंबध्द माहितीवर चर्चा केलेली दिसून येते. परंतू आदेश क्र. 2 हा बरोबर आहे. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरची माहिती ही कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती नाही. त्यामुळे त्यांना आयोगानी विचारले की अशा प्रकारे कार्यालयाच्या अभिलेखामध्ये माहिती उपलब्ध नसते तर आपण स्वतः जावून त्याची पडताळणी करुन खात्री करुन घ्यावी. परंतू त्यांनी असे सांगितले की त्या घर नंबर मध्येक ते स्वतः राहात आहेत. याचा अर्थ त्यांचेकडे माहिती आहे. शेजाराच्या घरात कोण राहाते हे माहित असून सुध्दा त्यांनी माहिती मागण्याचा प्रयत्न केलेला आहे. माहिती ही कोणतीही कारवाई करुन मिळत नाही तर उपलब्ध असलेली माहिती मिळते. व विशिष्ट नंबरचे घर हे शेजारी आहे काय अशी माहिती अभिलेखात उपलब्ध नसते व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.939-940

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1231 नाग/2010

श्री डॉ. मिलिन्द पंढरीनाथ जीवने
जीवक सोसायटी परिसर, नवा नकाशा,
स्वास्तीक शाळेसमोर नागपूर
ता. जि. नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डॉ. गणविर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा आरोग्य अधिकारी(स्व.)
नागपूर महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री व–हाडे
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक
नागपूर महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी आरोग्य अधिकारी(स्व.) नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे शहरातील साफसफाईकडे अधिका–यांचे दूर्लक्ष होत असल्यामुळे 1). मनपामध्ये ऐवजदाराची पध्दती ज्या वर्षापासून सुरु झाली सदर वर्षाची माहिती द्यावी. 2). सदर मनपामध्ये असलेल्या ऐवजदाराची झोन निहाय 1. ऐवजदाराचे नाव 2. जन्मतारीख 3. नियुक्तीची तारीख 4. पगार 3). सदर ऐवजदाराचे इएसआयसी नंबर, इपीएफ नंबरची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.7.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 24.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.8.2010 रोजी देण्यात आला आहे. व लकडगंज झोन क्र. 8 चे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की इएसआयसी नंबर, इपीएफ नंबर, Service Tax, Profession Tax No. आणि प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध झालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की आरोग्य विभागाकडे ही माहिती उपलब्ध नसते तर ती लेखा विभागाकडे उपलब्ध असू शकते. लेखा विभागास स्वतः जन माहिती अधिकारी आहे व अपीलकर्ता यांनी माहिती मागणे आवश्यक होते. आरोग्य विभागाकडे तसेच झोन यांचेकडे जी माहिती आहे ती त्यांना उपलब्ध झालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता हे सार्वजनिक हिताकरीता माहिती मागतात हे जरी सत्य असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे त्यांचे अर्ज नसतात. अर्ज किंवा अपीलामध्ये स्वच्छ लिखाण सुध्दा नसते खाडाखोड केलेली असते. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देतांना माहिती अधिका–यास किंवा अपीलीय अधिका–यास विनाकारण संधी मिळते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी यापुढे अर्ज व प्रथम अपीले ही माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध असेल त्या कार्यालयाकडे मागणे योग्य होईल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.942-943

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1253 नाग/2010 व अपील क्रमांक 1254 नाग/2010

श्री गोपीचंद वामनराव भांदककर
122, कलेक्टर कॉलनी, गोधनी,
नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एन. लोंढे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1, नागपूर
सदर, नागपूर
2) श्री एस. एच. साखरवाडे
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.1, नागपूर
सदर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता हे नंतर सुनावणीस हजर झालेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 20.5.2010 व दि. 10.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे 1) शासकीय मुद्रणालय नागपूर येथील मॅनेजर वर्गखोल्यातील आतील भागात रु. 4 लाखाचे पेंटींग कामाबाबद 2) शासकीय मुद्रणालय नागपूर येथील रु. 4.50 लाखाचे बाथरुम फ्लोरिंग व गडर लाईन दुरुस्तीची माहिती द्यावी. तसेच वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान संस्था रिझर्व्ह बॅंक चौक नागपूर येथील संचालक कॅबिन, ऑफीस व–हांडा याचें नुतनीकरणाचे मागणी संचालक यांनी केल्याबाबदचे पत्र व किती खर्च झाला याबाबद कामाचा तपशिल. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वार घेणार असे नमूद केलेले आहे. व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या

अनुषंगाने अपीलकर्ता यांना दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राच्या संदर्भात पुरावा जोडलेला नसल्याचे कळविले त्यावर त्यांनी चुकीने लिहिले आहे असे कळविले व त्यानंतरही संघटने तर्फे माहिती मागत आहे असेही कळविले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर होते व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 9.9.2010 रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आला अपीलकर्ता यांनी त्यांचे बरोबर श्री श्याम डाखोळे यांना सुनावणीच्या वेळेस आणलेले होते. त्यांचा सुनावणीशी काहीही संबंध नसतांना अडथळा आणत होते ही बाब श्री भांदककर यांच्या निदर्शनास आणून दिली. तर अपील अर्जावर निपक्षपाती निर्णय होण्यास्तव श्री डाखोळे यांना बाहेर जाण्यास सांगितले. परंतु ते बाहेर न जाता माझ्या कक्षातच अपिल सुनावणीच्या वेळी बसून होते व सारखे सुनावणी मध्ये अडथळाा आणत होते त्यामुळे सुनावणी घेता आली नाही. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचेकडे अनेक अर्ज सादर केलेले आहेत. त्या प्रत्येक अर्जात दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमुद केले परंतू त्याबबत सबळ पुरावा सादर केलेला नाही. एका अर्जात चुक होणे अभिप्रत आहे. परंतू सारखी चुक होणे अभिप्रत नाही. त्यामुळे नवीन अर्ज सादर केल्यास त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरचा निर्णय योग्य असल्यामुळे दोन्ही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.940-941

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1256 नाग/2010

श्री सुभाषचंद्र कोंडबाजी सहारकर
18, स्नेही पार्क, पा.खापरी (रेल्वे)
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(आस्थापना)
जलसंपदा विभाग
मंत्रालय, मुंबई 32
2) श्री गावडे
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (दक्षता) जलसंपदा विभाग
मंत्रालय, मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (दक्षता) जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे श्री सु.को.सहारकर व अन्य 3 यांचे विरुध्द सुरु असलेल्या चौकशी अहवालावर आजतागायत सर्व पत्रव्यवहार/टिप्पणी/शेरे व चौकशी अधिकारी यांनी शासनास सादर केलेल्या प्रकरणाची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.5.2010 रोजी प्रस्तूत प्रकरणी विभागीय चौकशी चालू असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1)(ज) नुसार आपल्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 3.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.7.2010 रोजी देण्यात आला असून अपील अमान्य केलेले असल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरच्या प्रकरणाची चौकशी अपूर्ण झालेली असल्यामुळे त्यातील कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत अधिनियमाचे कलम 8 (1)(ज) मध्ये अशी कोणतीही तरतुद दिसून येत नाही. परंतू जन

माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता हे स्वतः व अन्य तीन यांचे विरुध्द चौकशी अधिकारी यांनी अहवाल सादर केलेला असला तरी शासनाकडून त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही व त्या दरम्यानच चौकशीतील कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आली तर चौकशी गुणवत्तेबाबत परीणाम होवू शकतो व त्यामुळेच चौकशी अधिका–याचा अंतिम निर्णय शासनाकडून झाल्यानंतरच सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. व अधिनियमाचे कलम 8 (1)(ज) मध्ये अपराध्याचा तपास करणे, त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रिये मध्ये अडथळा येईल अशा प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास अपवाद करता येतो. अधिनियमाच्या तरतुदीमध्ये अपराधी असा शब्द वापरला असला तरी विभागीय चौकशीमध्ये तो अपचारी हा शब्द वापरला जातो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निर्णय त्याप्रमाणे दिलेला असल्यामुळे व तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.943-944

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1257 नाग/200**

श्री शेख सलीम शेख अकबर
इस्माईलपुरा, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री आर. एम. डुंबरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
सेठ रामनाथ लोईया इंग्लीश प्रायमरी स्कूल,
लाला ओली, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 31.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सेठ रामनाथ लोईया इंग्लीश प्रायमरी स्कूल, कामठी यांचेकडे इंग्लिश प्रायमिरी स्कूल कामठी च्या संदर्भा मध्ये एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 10.6.2010 रोजी शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा लागू होत नाही असे त्यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.6.2010 रोजी प्रथम अपील प्रथम दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सेठ रामनाथ लोईया इंग्लीश प्रायमरी स्कूल, कामठी या कायम विनाअनुदानित शाळेची आहे व सदहू शाळेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य संस्थेस किंवा शाळेस मिळत नाही. त्यामुळे मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर रिट पि.नं. 5132/2008 आदेश दि. 20.8.2009 नगर युवक शिक्षण संस्था व इतर 1 विरुध्द राज्य माहिती आयुक्त व इतर 1 नुसार माहिती अधिकारी यांची शाळा/संस्था माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीत लागू होत नसल्याने सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून शिक्षणाधिकारी यांनी सुध्दा निर्णय हा संस्थेच्या बाजुनी दिलेला आहे. तसेच प्रायमरी स्कुलचे मुख्याध्यापक हे ज्या शाळेला अनुदान मिळते त्या शाळेचे सुध्दा

मुख्याध्यापक आहेत. त्यामुळे शाळेला अनुदान मिळत नाही असे म्हणणे योग्य नाही. परंतू शाळेला अनुदान मिळते याबाबत कोणताही पुरावा आयोगाला सादर केलेला नाही त्यामुळे मा. शिक्षणाधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष हा योग्य दिसून येतो. अपीलकर्ता यांनी वर्तमानपत्राच्या आधारे अनुदानित व विनाअनुदानित संस्था हया माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत येतात असा केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय राज्य माहिती आयोगास बंधनकारक आहे असा समज झालेला आहे. परंतू केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय हा राज्य माहिती आयोगास बंधनकारक नाही. व त्याचप्रमाणे केंद्रीय माहिती आयोगाच्या निर्णया मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांचे पुढे निर्णयाचा कोणताही उल्लेख नाही व निर्णयामध्ये कोणत्याही प्रकारची कारणमिमांसा देण्यात आलेली नाही तसेच सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत विनाअनुदानित संस्था कशा येतात याबद्यल विवेचन नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेला युक्तीवाद हा योग्य नाही. महाराष्ट्र राज्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दिलेला निर्णय हा लागू होतो व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.946-947

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1255 नाग/200**

श्री राजा खान महेबुब खान
सुमित अपार्टमेंट, शनिवारी, कॉटनमार्केट
1ला माळा, सुभाष रोड पॅलेस नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(कच्चामाल)
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई
कृपानिधी, 9, वालचंद हिराचंद मार्ग, बेल्लार्ड इस्टेट,
मुंबई 400 001
2) जन माहिती अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ,
नागपूर 440012 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 17.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे वर्ष 2009 माहे सप्टेंबर ते 2010 एप्रिल महिन्याच्या कालावधी करीता. सोबतच्या अर्जात मागितल्या प्रमाणे कोळसा वितरणा संबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः तसेच सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 7.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.7.2010 रोजी दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या दि. 29.3.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचे उत्तर मिळालेले नाही व त्यानंतर जो पत्रव्यवहार झालेला आहे तो मुदतबाहय पत्रव्यवहार असून माहिती सुध्दा मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक हे माहिती अधिकारी म्हणून आयोगापुढे उपस्थित झाले परंतू त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती घेवून किंवा आयोगापुढे आपल्याला काय सादर करावयाचे आहे याचा अभ्यास न करताच ते हजर झालेले होते व त्यांना काहीही आयोगापुढे असे सांगता आले नाही यावरुन ते अकार्यक्षम अधिकारी आहेत असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी अर्ज दि. 29.3.2010 रोजी केला व माहिती मात्र एप्रिल 2010 पर्यंतची

मागितली व त्यामुळे विलंबाचा मुद्या हा त्यांनी प्रथम अपीलाच्या प्रकरणात निकालात काढलेला आहे. मात्र उर्वरीत माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही त्याबद्यल तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आहेत हा निष्कर्ष काढलेला आहे व त्यांचे स्पष्टिकरण मागविण्यात आलेले आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन आलेले आहेत व त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. व त्यामुळे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी पुढे असेही सांगितलेले आहे की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती इंग्रजी भाषेमध्ये आहे व महाराष्ट्र राज्याची राजभाषा ही मराठी आहे व त्यांना इंग्रजी कळत नाही. व त्यामुळे माहिती ही मराठीत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांना मराठीत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती ही मराठी भाषेमध्ये कागदपत्राच्या स्वरुपात (छायांकित प्रतीच्या स्वरुपात) विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढलेला असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.949-950

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1242 नाग/200**

श्री पांडुरंग कारुजी तितरमारे
के.ऑफ श्री एन.के.ठाकरे, प्लॉट नं. 266
श्री गुरुदेवनगर नंदनवन नागपूर
ता. जि. नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती प्रज्ञा गोडघाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एम. के. दिक्षित
जन माहिती अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. 17.9.2010 देण्यात आल्यामुळे सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 17.9.2010 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी उपस्थित राहण्याची सही केली परंतू प्रत्यक्ष सुनावणीस ते हजर नव्हते व नंतर मात्र ते हजर झाले. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यालयात दि. 1.7.2003 ते 31.5.2005पर्यंत मंडल कृषी अधिकारी अलीपूर ता. हिंगणघाट जि. वर्धा यांचे रोकड पुस्तिका मनी रसीद बूकची प्रमाणित तसेच छायांकित प्रत अशी एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली असून माहिती नोंदणीकृत व अति शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 10.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही कृषी अधिकारी अलीपूर ते कृषी अधिकारी हिंगणघाट यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अधिकचा कालावधी लागणार आहे व माहिती प्राप्त होताच आपणास तात्काळ उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.7.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होताच उपलब्ध करुन देण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता हे नंतर उपस्थित झाले. व त्यांनी नंतर सांगितले की त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही परंतू माहिती हवी आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी तालुका कृषी अधिकारी अलीपूर तसेच तालुका कृषी अधिकारी हिंगणघाट यांचेकडे माहिती मागितलेली असल्यामुळे व तालुका कृषी अधिकारी हे माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी

माहितीचा अर्ज हा त्या त्या माहिती अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक होते. व तसा तो त्यांनी केलेला दिसून येत नाही. याबद्यल त्यांनी कोणतेही स्पष्टिकरण आयोगापुढे दिलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की तालुका कृषी अधिकारी अलीपूर तसेच तालुका कृषी अधिकारी हिंगणघाट यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता दि. 10.6.2010 रोजी पत्र दिले होते परंतू त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळेच अपीलकर्ता यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे. सन 2003 ते 2005 या कालावधीतील आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना तालुका कृषी अधिकारी सुध्दा विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देवू शकलेले नाही. आता माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे ती त्यांना उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. अपीलकर्ता यांनी अतिशय व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली असल्यामुळे तसेच तीन वर्षाच्या कालावधीतील माहिती असल्यामुळे व ती तालुका कृषी अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांचेकडे न मागितल्यामुळे त्यांचा विलंबाचा मुद्या निकाली निघतो. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.951-952

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1275 नाग/2010

श्री रामदास दशरथजी दहाट
के.ऑफ श्री जी.ए.बन्सोड, 65 विवेकानंदनगर
साईमंदीर मागे, वर्धा रोड, नागपूर
ता. जि. नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री महलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,
मुंबई 32
2) श्री शास्त्री
जन माहिती अधिकारी अवरसचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,
मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 20.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी अवरसचिव शालेय शिक्षण विभाग यांचेकडे शिक्षण उपसंचालक नागपूर व शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. नागपूर यांनी माझे ऋध्दाश्रम विद्यालय कुही येथे मा. उच्च न्यायालय नागपूर यांचे आदेशानुसार दि. 15.2.2006 ला समायोजन केलेले आहे. परंतु शासनास दि. 7.11.09 व 19.11.09 ला शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी खोटी, चुकीची, दिशाभूल करणारी पुनर्नियुक्तीचा प्रस्ताव पाठविला. त्यामुळे मला दि. 31.8.06 पासून सेवानिवृती वेतन तसेच पूर्वलक्षीप्रभावाने थकित वेतन शिक्षणाधिका–यांनी दिलेले नाही. प्रस्तावानुसार केलेल्या कार्यवाहीची तसेच शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांच्या स्पष्टिकरणाची प्रमाणित प्रत देवून तात्काळ माहिती द्यावी. माहिती स्पिड पोस्टने द्यावी असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 21.6.2010 च्या पत्रान्वये दि. 29.11.2009 अन्वये

शासनास दिशाभूल करणारा प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर प्रस्तावानुसार कोणतीही कार्यवाही या कार्यालयाकडून प्रस्तावीत करणे शक्य होवू शकले नाही. तरी उपरोक्त प्रस्ताव सदर कार्यालयास उपलब्ध करुन दिल्यास योग्य ती कार्यवाही करणे शक्य होईल असे अवर सचिव महाराष्ट्र शासन यांनी अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 16.9.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी न घेता व निर्णय न देता अपीलकर्ता यांना पत्राद्वारे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.5.2010 रोजी ज्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना कोणतीही कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत किंवा त्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असंबध्द व निरर्थक अशी उत्तरे पाठविलेली आहेत. शिक्षण उपसंचालक यांनी कक्ष अधिकारी यांना पाठविलेल्या पत्रावर कार्यवाही काय झाली अशा प्रकारची माहिती त्यांनी मागितलेली होती. सदरचे पत्र हे शासकीय पत्रव्यवहार असल्यामुळे हा शालेय शिक्षण विभागाच्या सर्वसाधारण आवक नोंदवहीमध्ये त्याबाबतची नोंद असणे अपरीहार्य आहे असे असून सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतची कोणतीही चौकशी न करता व अर्जाच्या चुकीच्या तारखा टाकून जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर हे प्रमाणिकपणे काम करण्याचे लक्षण नाही त्यांच्या ज्या कार्यासनात सदरचे पत्र नसेल तर ज्या कार्यासनात पाठविलेले असेल त्याबाबतचा शोध घेवून अपीलकर्ता यांचा अर्ज हस्तांतर करणे आवश्यक होते. परंतू जन माहिती अधिकारी यांनी तोही त्रास घेतलेला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांना तर अपीलकर्ता यांनी काय माहिती मागितलेली आहे याचे आकलन झालेले नाही. व त्यांनी तिस–याच प्रकारचे उत्तर पाठविलेले आहे. याचा अर्थ शालेय शिक्षण विभागामध्ये कोणत्याही प्रकारचे अर्जाचे वाचन न करता नागरीकांना उत्तरे पाठविण्याची पध्दत दिसून येते. आयोगापुढे सुनावणीस येईपर्यंत सुध्दा अपीलकर्ता यांनी उल्लेख केलेल्या पत्रव्यवहाराचा शोध घेतलेला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्याबाबतही माहिती मिळालेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचे सेवानिवृत्ती वेतनाच्या संदर्भातील पत्रव्यवहार हा वित्त विभागाच्या विचाराधिन आहे. वित्त विभागानी पुन्हा त्यात काही त्रुटी असल्यामुळे शालेय शिक्षण विभागाकडून माहिती मागितलेली आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांना त्याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सहसचिव सारख्या पदावर असणा–या अधिका–यानी प्रथम अपीलाचे निर्णय देतांना अर्जदाराचा अर्ज प्रथम अपील मेमोमध्ये त्यांनी काय मागणी केलेली आहे त्याचे स्वतः वाचन करुन माहिती करुन

घेतल्यास विषयाचे आकलन होवू शकते. यापुढे जन माहिती अधिकारी तथा अवरसचिव यांनी जे उत्तर पाठविलेले आहे अशा प्रकारचे निरर्थक उत्तरे पाठवू नयेत. त्याकरीता जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे संयुक्तीक राहील. अपीलकर्ता यांचेकडून दि. 19.11.2009 व 7.11.2009 या दोन पत्राच्या प्रति उपलब्ध करुन घेवून त्यावर माहिती देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जात उल्लेख केलेल्या शिक्षण उपसंचालक ते कक्ष अधिकारी या पत्रव्यवहाराच्या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी अर्जाप्रमाणे योग्य ती माहिती दिली नसल्याने त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.952-954

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1276 नाग/2010**

श्रीमती सुनंदा दत्तात्रय अरमरकर
तर्फे श्री दिलीप दत्तात्रय अरमरकर
रा. रेशीमबाग प्लॉट नं. 68
गजानन महाराज मंदिराचे पाठीमागे
कॉरपोरेशन शाळेजवळ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक
नागपूर विभाग नागपूर
66, शिवनेरी, रामदासपेठ, नागपूर
2) जन माहिती अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर विभाग नागपूर
66, शिवनेरी, रामदासपेठ, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 20.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यालया मध्ये सेवा पुस्तकातील पत्र दि. 25.5.1984 ची झालेल्या नोंदीची माहितीची प्रत पाहिजे. पत्र अे.जी.ला केव्हा पाठविले याची माहिती व पत्र दि. 2.5.09 आणि दि. 19.5.2009 ग्रॅच्युईटीचे बद्यलचे व पत्र दि. 4.10.2004 चे व 1980 ते 1985पर्यंत pay allowances का दिले नाही याची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 23.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 8.6.2010 रोजी अपीलकर्ता यांच्या दि. 25.2.2010, दि. 8.3.2010, दि. 12.3.2010, (तीन अर्ज) दि. 23.3.2010 च्या अर्जांची माहिती माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली व सदरची मागितलेली माहिती संबंधितास सहाय्यक माहिती अधिकारी यांनी दिली. परंतू अपिलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी अनेक अर्जांच्या माध्यमातून त्यांच्या वडीलांच्या सेवानिवृत्तीच्या संदर्भातील माहिती मागितलेली आहे. परंतू त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना सर्व माहिती आतापर्यंत उपलब्ध करुन दिलेली आहे. सेवा पुस्तकातील पत्र दि. 25.5.84 ची नोंद सेवा पुस्तकात नाही तेही त्यांना कळविण्यात आलेले आहे. व

त्यांच्या सर्व माहितीच्या अधिकराचा अर्ज सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांना दिलेले आहेत. सदरच्या सर्वच दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपिलकर्ता यांना माहितीपेक्षा कार्यवाही करुन अपेक्षित दिसून येते. अपिलकर्ता हे बिनापरवानगीने गैरहजर राहिलेले असल्यामुळे वेतन काढलेले नाही व इतरही कार्यवाही झालेली नाही व त्यानंतर दि. 25.5.1984 च्या आदेशान्वये त्यांना बडतर्फ करण्यात आले व शासनाचे पत्र क्र. कृषीआ2706/4612/प्र.क्र. 116/16अे मुंबई दि. 29.1.2008 नुसार देता येत नाही असे त्यांच्या मागणीच्या संदर्भात कळविण्यात आलेले आहे. यावरुन अपिलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध झालेली आहे. आता संपूर्ण सेवापुस्तक सुध्दा छायांकित करुन आणलेले आहे व ते अपिलकर्ता यांना दिलेले आहे. विलंबाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या प्रतिनिधीचे वडील श्री अरमरकर हे 1984 मध्येच बडतर्फ झालेले असल्यामुळे व त्यांनी जी तपशिलात माहिती दिलेली आहे ती सर्व शोधून काढण्याच्या संदर्भामध्ये विलंब झालेला आहे. परंतू त्यांची मागणी ही कार्यवाहीची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे तपासणीची आवश्यकता नाही त्यामुळे अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते. निकाली काढण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.956-957

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1273 नाग/2010 व अपील क्रमांक 1274 नाग/2010**

**<u>अपील क्रमांक 1273 नाग/2010</u>**

श्री सुधाकर केशवराव बागडे
बस स्टॉप मागे, हाऊसिंग बोर्ड कॉलनी, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत भानेगाव
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 1274 नाग/2010</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री साबळे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत चिचोली (खा.)
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 20.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under

certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी वरील दोन्ही अपीलांच्या संदर्भामध्ये दि. 24.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी सावनेर पंचायत समिती यांचेकडे ग्रामपंचायत भानेगाव व ग्रामपंचायत चिचोली (खा.) क्षेत्रामधील किती ग्रामस्थांची कर आकारणी केली अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.6.2010 रोजी ग्रामविकास अधिकारी भानेगाव ग्रामपंचायत यांनी प्रश्न विचारुन अभिप्राय देता येत नाही अशा प्रकारचे उत्तर त्यांना दिले तर ग्रामविकास अधिकारी चिचोली (खा.) ग्रामपंचायत यांनी दि.28.6.2010 रोजी प्रश्न विचारुन अभिप्राय विचारलेले अपेक्षित नसल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2010 रोजी दोन प्रथम अपीले प्रथम अपीलीय अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे दाखल केली. ग्रामपंचायत भानेगाव च्या संदर्भामध्ये प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली नाही. व ग्रामपंचायत चिचोली (खा.) च्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी गैरहजर असल्यामुळे सुनावणी होवू शकली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. व चुकीची व दिशाभूल करणारी उत्तरे देण्यात आलेली आहेत. त्यांनी कोणताही प्रश्न विचारलेला नाही. किती ग्रामस्थांची कर आकारणी केली आहे याबद्यलची यादी द्यावी हा प्रश्न होत नाही. जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले नाही. तर अभिलेख्यावर जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की ग्रामस्थांच्या कर आकारणीच्या संदर्भामध्ये यादी उपलब्ध नसते तर प्रत्येक ग्रामस्थांच्या संदर्भात नमुना नं. 8 मध्ये माहिती असते. माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. परंतू अशा प्रकारे उत्तरे मात्र देण्यात आलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी स्वतः माहिती न देण्याच्या दृष्टीने निरर्थक उत्तर पाठविलेले आहे. व त्यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दोन्ही ग्रामपंचायत हद्यीतील ग्रामस्थांच्या कर आकारणीची नमुना नं. 8 ची छायांकित प्रति स्वतःच्या खर्चाने विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांनी अपीले सादर केली नाही म्हणून अपीलाची सुनावणी घेता आलेली नाही तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित झाले नाही म्हणून अपीलाची सुनावणी घेता आली नाही असे दोन्ही अपीलांच्या संदर्भात कारणे दिलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर करण्याचे कर्तव्य नाही. अपील हे जन माहिती अधिकारी यांचे निर्णया विरुध्द असल्यामुळे ते स्वतंत्रपणे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडेच सादर झालेले पाहिजेत. याबद्यलची कार्यवाही खंड विकास अधिकारी यांना माहिती आहे असे दिसून येत नाही. त्यांना प्रशासनाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन अशा प्रकारची उत्तरे आयोगाकडे

दिली जाणार नाहीत. जन माहिती अधिकारी हे उपस्थित राहात नसतील तर त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही केलेली असली पाहिजे ती केलेली दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराचा वापरच केलेला नाही त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे सदरची दोन्ही अपीले मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे **अपील क्रमांक 1273 नाग/2010 व अपील क्रमांक 1274 नाग/2010** ही दोन्ही अपीले मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्या त्या संबंधित ग्रामपंचायत हद्दीतील कर आकारणी झालेल्या ग्रामस्थांची यादी विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. छायांकित प्रतींचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी स्वतः करावयाचा आहे. तो ग्रामपंचायत निधीमधून करावयाचा नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी स्वतः निर्णय मिळाल्यापासून 10 व्या दिवशी दोन्ही जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः उपस्थित होवून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.959-961

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1277 नाग/2010 व अपील क्रमांक 1278 नाग/2010**

श्री रविंद्र मारोती गडेकर
मु. पो. अडयाळ (मंढई पेठ, वार्ड नं.1)
ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जे. डब्लू राऊत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती पवनी
ता. पवनी जि. भंडारा
2) श्री एच. एम. खंडाईत
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत अडयाळ
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 20.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क. 1277 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत अडयाळ यांचेकडे वार्ड नं. 6 मधील मंजुर झालेल्या आंगणवाडी बांधकाम एस्टीमेट व नकाशा देण्यात यावा. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 23.4.2010 रोजी बांधकामचे एस्टीमेट व नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. व अपीलकर्ता यांनी प्रत मिळाली अशी लेखी पोच दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 18.5.2010 रोजी माहितीचे जास्त पैसे भरल्याबद्यल प्रथम अपील दाखल केले. आंगणवाडी बांधकाम एस्टीमेट व नकाशा मिळाला तरी प्रथम अपीलात नमूद केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली त्यावेळेस अपीलकर्ता हजर झाले नाहीत. परंतू एकतर्फी निर्णय देण्यात येवून अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असून त्यांना विनामुल्य माहिती पुरविण्याची तरतुद आहे. करीता सचिवाने अर्जदारास रु. 35/– परत करावे असे

आदेश दिलेले दिसून येतात. परंतू आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना एस्टीमेटची प्रत मिळाली परंतू नकाशाची प्रत मिळाली नाही. परंतू मिळालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी पोच देतांना तसा आक्षेप घेतलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना एस्टीमेट व नकाशाची प्रत दिलेली आहे. दारिद्रय रेषेखालील अर्जदारास विनामुल्य माहिती द्यावी लागते याबद्यलची त्यांना माहिती नव्हती व म्हणून त्यांनी रु. 35/– चा भरणा करुन घेतला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी रु. 35/– परत करण्याचे असे आदेश दिले परंतू जन माहिती अधिकारी यांनी आदेशाचे पालन केलेले नाही. मात्र द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटिस प्राप्त झाल्यानंतर रु. 35/– परत करण्याची कार्यवाही त्यांनी केली. मात्र अपीलकर्ता यांनी पैसे परत घेतले नाही. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1278 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 27.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत अडयाळ यांचेकडे 2008 ते 2009 या कालावधीत ग्राम स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजना अंतर्गत किती लोकांनी अर्ज केला होता व ग्रामसभेमध्ये किती लोकांना मंजुरी देण्यात आली व त्यातील किती लोकांना कर्ज उपलब्ध झाले याची माहिती लेखी देण्यात यावी तसेच 2009 ते 2010 मध्ये घेण्यात आलेल्या ग्रामसभेच्या ठरावाच्या प्रती देण्यात याव्या अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये ग्रामसभेचे रेकॉर्ड अपीलकर्ता यांना दाखवून माहिती देण्याचे मान्य केले परंतू त्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

5. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी ग्रामपंचायतीनी किती लाभार्थींची नावे पाठविली व ग्रामसभेच्या संदर्भातील माहिती मागितली तसेच सन 2009 ते 2010 मधील ग्रामसभेच्या ठरावाच्या प्रती मागितल्या ही माहिती निश्चितच ग्रामसचिव यांचेकडे असली पाहिजे तरीही त्यांनी नाकारलेली आहे. कर्ज मंजुर झाल्याच्या संदर्भामध्ये ती यादी विस्तार उद्योग अधिकारी यांचेकडे असते असे विस्तार अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे त्याच वेळेस अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतू ती उपलब्ध करुन दिली नाही. त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना दिलेली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 250/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्र. 1277 नाग/2010 हे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे खारीज करण्यात येते.

2) अपील क्र. 1278 नाग/2010 हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 27.3.2010 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती व त्यापैकी उपलब्ध असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात याव्या.

3) अपीलकर्ता यांच्या दि. 27.3.2010 अर्जाच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन न देता दिशाभूल करणारे उत्तर दिलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 250/— ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070—इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070—016'1)'' मध्ये खंड विकास अधिकारी यांनी जमा करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.963-965

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1304 नाग/2010

श्री नविनचंद्र एस. चितोरे
अंबिका, प्लॉट नं. 14 अ, श्रीनगर नागपूर
ता. जि. नागपूर 440022 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री श्रीकृष्ण भारंभे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव(परीक्षा)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
एल आय टी परिसर, अमरावती रोड नागपूर 33
2) सौ. विनय मेश्राम
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव(पुर्नमुल्यांकन)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
महाराजबाग जवळ, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी परीक्षा विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचेकडे अपीलकर्ता यांची मुलगी श्रेया एन. चितोरे यांच्या बी.ई.प्रथम वर्षाच्या रोल नं. 122479 Information Technology परीक्षेतील 1. Mathematics I 2. Mathematics II 3. Engineering Mechanics 4. Engineering Drawing 5. Electrical Engineering 6. Applied Chemistry या वर्षातील छायांकित प्रती स्पिड पोस्टनी उपलब्ध करुन द्याव्या अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने निर्देश क्र. 5/2004 च्या तरतुदी नुसार विद्यार्थ्यास फक्त दोन विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती साठी आवेदन पत्र 'अ' व संबंधीत महाविद्यालयात रु.300/– प्रती विषय शुल्क जमा करुन जाहीर झाल्यापासून 12 दिवसाचे आंत (गुण पत्रिकेवर नमूद दिनांकापासून) जमा करणे अनिवार्य आहे. आपण अर्जात नमूद केल्यानुसार उन्हाळी 2010 परीक्षेतील प्रथम वर्ष

बी.ई.(परीक्षा क्रमांक 122479) या अभ्यासक्रमातील सहा विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती निर्देशातील तरतुदी नुसार आपणास पुरविता येणार नाही. त्याच प्रमाणे उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला दिलेले निर्देश विद्यापीठाला लागु होत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 1.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.9.2010 रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कोणत्या कलमा अंतर्गत माहिती देण्याचे नाकारण्यात आले ते कलम कृपया कळवावे असे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असे नमूद केलेले आहे. व युक्तीवादामध्ये सुध्दा विद्यापीठाने एक वेळ उत्तरपत्रिका देण्याचे निणय घतलेले असल्यामुळे गोपनियतेचा प्रश्न उपस्थित होत नाही. विद्यापीठाच्या निर्णया प्रमाणे परीक्षेचा निकाल किंवा गुण पत्रिकेवर असलेल्या तारखेपासून 12 दिवसाचे आत प्रत्येकी रु. 300/– भरुन दोन विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रति मिळू शकतात व त्याप्रमाणे दोन विषयाच्या उत्तरपत्रिका करीता त्यांनी प्रत्येकी रु. 300/– भरुन गुण पत्रिका मिळविलेल्या आहेत. परंतू त्यांना उर्वरीत 6 विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतिची आवश्यकता आहे. परंतू ती त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावे अशी मागणी केली. परंतू त्यांना 6 विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती निर्देश तरतुदी नुसार आपणास पुरविता येणार नाही असे कळविले. निर्देश हे विद्यापीठाचे आहेत व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हे केंद्र शासनाचे अधिनियम आहेत. व त्यामुळे केंद्र शासनाच्या अधिनियमाच्या तरतुदी हया विद्यापीठाच्या निर्देशापेक्षा प्रभावी असल्यामुळे व कोणत्याही प्रकारची गोपनियता नसल्यामुळे व कलम 8 मधील माहिती प्रकट करण्यास अपवाद असलेल्या निकषां प्रमाणे तरतुद नाही. व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली पाहिजे असे त्यांनी युक्तीवादात सांगितले. जन माहिती अधिकारी / अपीलकर्ता / प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की नागपूर विद्यापीठाच्या निर्देश नं. 5/2004 (Issued under Section 14(8) of the Maharashtra Universities Act, 1994) प्रमाणे परीक्षार्थीस फक्त दोनच विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतिची मागणी तीही प्रत्येकी रु. 300/– भरुन विहित मुदतीचे आत केल्यासच मिळू शकतात असे विद्यापीठाचे निर्देश आहेत. तसेच दि. 7.3.2009 च्या बैठकीमध्ये "the information to the examination section should be treated to be confidential in nature and should not be supplied in response to the applications under the Right to Information Act. The information related to the examination section should be treated as exemption from disclosure in terms of section 8 of the R.T.I.Act in so far as nature of the information is concerned". असा निर्णय

झालेला असल्यामुळे व उत्तरपत्रिका हा परीक्षेचा भाग असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही.

4. परंतू वर नमुद केल्याप्रमाणे उत्तरपत्रिका हया उपलब्ध करुन देण्याचा निर्णय हा विद्यापीठाचा आहे. त्यामुळे गोपनियतेचा प्रश्न नाही. त्यात फक्त संख्येचा प्रश्न आहे व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन द्याव्या किंवा नाही असा आहे. त्यामुळे गोपनियतेचे कारण हे उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्याकरीता घेता येणार नाही.

5. तसेच अधिनियमाच्या कलम 8 (1) मध्ये उत्तरपत्रिका उपलब्ध करुन न देण्याच्या संदर्भामध्ये कोणताही अपवाद केलेला नाही. उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येवू नये ही बाब कलम 8 (2) चे (क) व (ड) प्रमाणे अपवादामध्ये येवू शकते. परंतू मुळातच उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्याचा निर्णय हा विद्यापीठाचाच आहे. व त्यामुळेच कलम 8 चा आधार घेता येणार नाही. परीक्षा विभागाच्या इतर बाबी संदर्भामध्ये मात्र प्रकरणपरत्वे अपवाद करता येण्या सारखा आहे. व विद्यापिठाचा ठराव त्या दृष्टीने योग्य आहे.

6. तसेही अधिनियमच्या कलम 22 प्रमाणे अधिनियमच्या तरतुदी हया शासकीय गुपिते अधिनियम 1923 यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये या अधिनियमा खेरीज कोणत्याही अन्य कायद्याचा आधार अंमलात असणा–या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी अंमलात येतील अशी तरतुद आहे. त्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 हा राज्य विधान मंडळाचा अधिनियम असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया प्रभावी ठरतात व त्या खाली केलेले नियम किंवा निर्देश हे माहितीच्या अधिकाराशी विसंगत असल्यास कलम 8 चा अपवाद वगळुन प्रभावी ठारणार नाही. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे हा नियम आहे.

7. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास दोन प्रकारच्या पधती ठरविण्यात आलेल्या आहेत.

(एक) छायांकित प्रति उपलब्ध करुन देण्यासंदर्भात व

(दोन) नस्तीचे किंवा माहितीचे कागदपत्रांचे निरिक्षण करणे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी उर्वरित 6 उत्तरपत्रिकाचं निरिक्षण केल्यास त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध होवू शकते. अपीलकर्ता यांनी संबंधित विद्यार्थ्यांस सोबत घेवून उत्तरपत्रिकाचें निरिक्षण करुन घेणे हे अधिनियमाच्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे नियमानुसार राहील. विद्यापिठाच्या नियमाप्रमाणे आधीच अपीलकर्ता यांनी दोन विषयांच्या आवश्यक त्या उत्तरपत्रिका छायांकित प्रती घेतलेल्या असल्याने उत्तरपत्रिका छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी संबंधित विद्यार्थ्यासह उपस्थित राहून सदरच्या उत्तरपत्रिकांचे निरीक्षण करावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.965-968

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1285 नाग/2010 व अपील क्रमांक 1286 नाग/2010

श्री जनार्दन गुलाबराव मून
केन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,
791, नागसेन वन, नागपूर
ता. जि. नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती पतंगे
जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक
शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 4.6.2010 व दि. 7.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे उत्तर नागपूर विभागातील अनुदानित खाजगी माध्यमिक शाळांचे 1. सन 2009–10 चे स्टाफ अप्रुव्हलची सत्यप्रत 2. शिक्षक शिक्षकेतर कर्मचा–यांची यादी (संवर्ग, नेमणूकीचा दिनांक, मान्यतेच्या दिनांकासहीत) इत्यादी माहिती देण्याची तसदी घ्यावी. (शासन मान्य अल्पसंख्यांचा दर्जा सोडून) तसेच दि. 17.5.2010 ते दि. 4.6.2010 या कालावधीत आपल्या कार्यालयात दिलेल्या अप्रुव्हलच्या सत्यप्रती व त्या त्या शाळेचे सन 2009–10 चे स्टाफ अप्रुव्हल तसेच संवर्गासहीत शिक्षक शिक्षकेतर कर्मचा–यांची यादी इत्यादी माहिती देण्याची तसदी घ्यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती

नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अनुक्रमे दि. 6.7.2010 व दि. 13.7.2010 रोजी प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की आतापर्यंत त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध तर झालेली नाहीच परंतू त्या अर्जाची सुध्दा दखल घेतलेली नाही तसेच प्रथम अपीलाची सुनावणी किंवा निर्णय सुध्दा दिलेला नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा समाधानकारक खुलासा केलेला नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जाची दखल घेतलेली दिसून येत नाही. तसेच त्याबाबत कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या सुनावणी घेतलेल्या नाहीत. व निर्णयही दिलेला नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंमलबजावणी बद्दल संपूर्ण उदासिनता दाखविलेली दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असून अधिनियमाच्या कलम 20 (1) नुसार ते दोषी आढळुन येतात. व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपीलाची सुनावणी न घेतल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही ही मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद नागपूर येथील शिक्षण विभागातील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींची अंमलबजावणी न करण्याची प्रवृत्ती दिसून येते. माहितीच्या अर्जाची दखल घेतलेली नाही प्रथम अपीलाचा निर्णय दिल्या जात नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल करावी लागतात. याबाबतची दखल मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सुध्दा याबाबत दखल घेणे आवश्यक आहे. अन्यथा शासनास त्याबाबत कळवावे लागेल याची नोंद मुख्य कार्यपालन अधिकारी तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1285 नाग/2010 व अपील क्रमांक 1286 नाग/2010 मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.6.2010 व दि. 7.6.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) तत्कालीन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.6.2010 व दि. 7.6.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही किंवा दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे प्रत्येकी रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर व विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.977-979

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1289 नाग/2010

सौ. उर्मिला लक्ष्मण काटोले
प्लॉट नं. 163, सुयोगनगर, एन.आय.टी.गार्डन जवळ,
नरेंद्रनगर पोस्ट नागपूर
ता. जि. नागपूर 440015 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. सी. सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री हटटेवार
जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.3
नागपूर नविन प्रशासकिय इमारत, नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.3 यांचेकडे अपीलकर्ता यांचा दाभा येथील भु.क्र.281 ची नोंदणीची निश्चित तारीख कळविण्यात यावी किंवा नोंदणी कार्य पूर्ण झाल्यास मालमत्ता हक्क पत्रक कार्यालयात खालील माहिती सोबत पाठविण्यात यावे अशी माहिती एकुण आठ मुद्यांवर मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 5.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी दि. 23.2.2010 ला आवक विभागात लेखी तक्रार दाखल केलेली आहे व जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या संदर्भात त्यांना कोणत्याही प्रकारचे उत्तर किंवा माहिती आतापर्यंत देण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की

दि. 28.6.2010 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध आहे ती घेवून जावी असे कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आखीव पत्रिका तयार करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसते. परंतू तरी सुध्दा त्यांच्या तक्रार पत्राप्रमाणे नोंद घेवून आखीव पत्रिका तयार करण्यात आली. आखीव पत्रिका ही विनामुल्य मिळत नाही व त्यामुळे त्याचा रु. 75/— चा भरणा त्यांना करावा लागेल मात्र नोंद घेण्याची प्रक्रिया याबाबत विलंब झाला असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करता येत नसल्यामुळे व ती मालमत्ता पत्रकाच्या संदर्भातील प्रक्रिया असल्यामुळे विलंबाबाबत काहीही सांगता येत नाही असेही त्यांना कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना ते पत्र मिळालेले नाही. मात्र जावक नोंदवही मध्ये त्याबाबतची नोंद केलेली आहे. यावरुन सदरचे पत्र साध्या टपालाने पाठविलेले आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये माहिती कशी घेणार हे दिलेले नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. प्रथम अपीलाच्या रोजनाम्या मध्ये सुध्दा माहिती दिल्याची नोंद आहे. तरी सुध्दा आयोगाचे समोरच अपीलकर्ता यांना आखीव पत्रिकेची नक्कल देण्यात आलेली आहे व त्याबद्यलची फी ही भरण्यास सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.981-982

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1288 नाग/2010

श्री ॲड. एस. ए. मानकर
माता मंदिर जवळ सिव्हील लाईन्स
गोंदिया ता. जि. गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
आदिवासी विकास भवन, आर.टी.ओ.समोर,
गिरीपेठ, नागपूर
2) श्री गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
आदिवासी विकास भवन, आर.टी.ओ.समोर,
गिरीपेठ, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी सह आयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांचे कार्यालयात दि. 24.4.2009 च्या आदेशाच्या निकालाची प्रत तसेच नोहरलाल शिवप्रसाद श्रीभद्रे यांच्या विरोधातील श्री भागवत मुख्याध्यापक व ॲड. एस. ए. मानकर सचिव भ्र.वि.ज.आं. (महाराष्ट्र) गोंदिया शाखा यांनी केलेल्या तक्रारीचा निर्णय आदेश अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.6.2010 रोजी श्री नोहरलाल शिवप्रसाद श्रीभद्रे यांच्या प्रकरणी समितीने अद्याप निर्णय घेतलेला नसल्यामुळे निर्णयाची प्रत देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती मिळाली परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की गेल्या 9–10 वर्षापासून कोणतेही निर्णय घेतले जात नाही व त्यामुळे त्यांना माहिती मागावी लागली. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही अर्ज केल्याच्या वेळेस जी वस्तुस्थिती असते त्याप्रमाणे कळविणे अपेक्षित आहे व तशी ती कळविण्यात आलेली आहे. कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित नाही व आयोगास तसे आदेशही देता येत नाही. हे तक्रार निवारण न्यायालय नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.983-984

जा.क्र.––––––––– दि.................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1287 नाग/2010**

श्री कैलास मधुकरराव घुमडे
रा. पेठ मंगळवारी, जुना मोटर स्टँड जवळ
उमरेड ता. उमरेड जि. नागपूर 441203 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री भूसारी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स अनेक्स, सिताबर्डी, नागपूर
2) श्री ठाकुर
जन माहिती अधिकारी
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स अनेक्स, सिताबर्डी, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 21.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचे कार्यालयात मी अस्थीव्यंग आहे. नागपूर (ॲडमिनीस्ट्रेशन) रिजन, ज्युनिअर क्लर्क (ॲडमिनीस्ट्रेशन) मध्ये लेखी स्पर्धा परीक्षा दि. 2.11.2009 ला रोल नं. 450213 असून मला एम.के.सी.एल.परीक्षेत किती मार्क आहे आणि जागेवर लागलेल्या अपंगास किती मार्क आहे याची माहिती पाठविण्यात यावी. सोडविलेल्या पेपरची झेरॉक्स पाठविण्यात यावी सोबत प्रवेश पत्राची झेरॉक्स पाठवित आहे. अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 5.5.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व निर्णय हा दि. 25.6.2010 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना इतर माहिती मिळाली परंतू माहिती मिळाल्यानंतर अशा प्रकारची जागा नव्हती तर मला इंटरव्हू कॉल कां देण्यात आला अशी विचारणा केली व ती माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की जाहिरातीमध्ये स्पष्टपणे नागपूर विभागाकरीता कर्णबधीर व औरंगाबाद विभागाकरीता अस्थिव्यंग या संदर्भात आरक्षण दिलेले आहे. अपीलकर्ता यांनी नागपूर विभागाकरीता अर्ज करणे आवश्यक नव्हते. परंतू जाहिरात स्पष्ट असून सुध्दा त्यांनी नागपूर विभागाकरीता अर्ज केला. परंतू औरंगाबाद विभागाकरीता अस्थिव्यंगाची जाहिरात होती. सदरची परीक्षा ही एम.के.सी.एल. यांनी घेतलेली आहे व एम.के.सी.एल. यांनी अर्ज का स्वीकारला व इंटरव्हू करीता का बोलाविले या बद्यलची माहिती या कार्यालयात नाही. मात्र अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यावरुन त्यांनी सक्षम अधिकारी यांचेकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.986-987

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1296 नाग/2010

श्री पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे
रा. नविन बस स्टॅंड समोर, काजी वार्ड हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 22.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांनी तलाठी संवर्गाचे लेखी दुय्यम सेवा विभागीय परीक्षा 2008 घेण्याकरीता मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांचे आदेश दि. 4.9.2010 प्रमाणे नियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे सुनावणीसाठी हजर राहू शकत नाही तरी मुदत मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे तलाठी श्री अशोक वाघाडे यांच्या संदर्भात राज्य माहिती आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात कार्यवाहीची माहिती एकुण आठ मुद्यांमध्ये नोंदणीकृत रजिस्टर टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज हा स्वीकारला नसल्यामुळे व रजिस्ट्रीमध्ये स्वीकारु नये असे सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 15.6.2010 रोजी घेण्यात आली असून अर्जदाराने मागणी केलेली माहिती तलाठी यांचे संबंधी असून उपविभागीय अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी व या कार्यालयातील सदर

अपील खारीज करण्यात यावे असे मत प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचे झालेले असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी सौ. निघडे यांनी माहिती अधिकाराचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला व माहिती अधिकारालाच माहिती मागा. माहिती आयोगाला तेवढेच काम आहे. तुमचा अर्ज येथे कोणीही स्वीकारणार नाही डिस्पॅचरला बोलावून यांचा अर्ज रजिस्ट्री पोस्टाने आल्यास तो स्वीकारावयाचा नाही यांचे नाव लिहुन ठेवा माहिती मागण्यास संबंधित विषयाची कोणाकडे जावू तुम्हाला जावयाचे तेथे जा मी सांगू शकत नाही असे त्यांनी सांगितले. परंतू त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. परंतू प्रथम अपीलात सुध्दा जो निर्णय दिलेला आहे त्यात कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन किंवा तथ्य नाही व म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले.

4. वर नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मुदत मागितलेली आहे परंतू कागदपत्रे सुध्दा सादर केलेली नाहीत. व त्यामुळे त्यावर जन माहिती अधिकारी यांचेकडून काहीही कार्यवाही झालेली आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अर्ज स्वीकारायचा नाकारल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाचे अवलोकन केले असता त्यातून काहीही अर्थबोध होत नाही असा जो निर्णय आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध होवू नये अशाच प्रकारे निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील मेमोमध्ये अपीलाची जी कारणे दिलेली आहेत त्या कारणाच्या संदर्भामध्ये कोणतेही विश्लेषण केलेले नाही किंवा त्या कारणाची दखल सुध्दा घेतलेली नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला. डिस्पॅचरला बोलावून यांचा अर्ज रजिस्ट्री पोस्टाने आल्यास तो स्वीकारु नये असे आदेश दिले व राज्य माहिती आयोगाविषयी अनुद्‌गार काढले या कारणास्तव त्यांचे विरुध्द रु. 25000/— शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी

कार्यालय वर्धा यांनी आयोगापुढे करावा अन्यथा रु. 25000/–ची शास्ती कायम करण्यात येईल.

2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्यात प्रथम अपीलामध्ये जी कारणे दिलेली आहेत त्याबाबतचा कोणताही उल्लेख केलेला नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा रद्द करण्यात येत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द मा. जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.989-991

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1298 नाग/2010**

श्री हेमराज तुकाराम गेडे
झाशीनगर छत्रपतीवार्ड, बियानीनगरचे बाजुला,
तुकुम, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर 442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. डी. गोडवे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक–2
चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत केंद्र चंद्रपूर
उर्जानगर, चंद्रपूर 442404
2) श्री चवरे
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (प्रशासन) )
चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत केंद्र चंद्रपूर
उर्जानगर, चंद्रपूर 442404 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 22.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी मुख्य महाव्यवस्थापक(निर्मिती) चंद्रपूर महाऔष्णीक विद्युत केंद्र चंद्रपूर यांचे कार्यालयात 1). श्री अजय मित्तल मे. शक्ती एन्टरप्राईजेस गणेशनगर, तुकुम, चंद्रपूर यांना आपण नियंत्रण प्राधिकारी उपदानप्रदान अधिनियम 1972 तथा सहाय्यक कामगार आयुक्त चंद्रपूर यांचे पत्र दि. 30.1.2008 चे प्रकरणात सौ. सुमन लॉरेन्स मानकर व इतर 16 कामगारांना उपदानाची रक्कम 30 दिवसाचे आत अदा करण्याबाबत कळविले होते. त्याप्रमाणे मे. शक्ती एन्टरप्राईजेस यांनी उपदानाची रक्कम वाटप केली काय 2). उपदानाची रक्कम वाटप केले असल्यास वाटप केल्याबाबतचे दस्तऐवज देण्यात यावे. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.7.2010 रोजी अपीलकर्ता यांना मे. शक्ती एन्टरप्राईजेस यांचे तर्फे प्रकरणात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिटपिटीशन दाखल करण्यात आलेली आहे व यावर मा. उच्च न्यायालयाने स्थगनादेश दिलेला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतू दि. 21.8.2010 रोजी मे. शक्ती एन्टरप्राईजेस यांनी कळविल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की कामगारांची उपदानाची रक्कम देण्याची जबाबदारी ही महावितरणाची आहे. त्यामुळे त्यांनी माहिती मागितली होती व त्यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे व जी माहिती दिली ती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी ज्या कामगारांची उपदानाची माहिती मागितली ते कामगार हे महावितरणाचे कामगार नाही तरी महावितरणाचे मे. शक्ती एन्टरप्राईजेस कडून काम करवून घेतले त्या एजन्सीचे कामगार आहेत व त्यामुळे सरळ जबाबदारी ही महावितरणाची नाही. मात्र महावितरणाने मे. शक्ती एन्टरप्राईजेसला पत्र दिलेले आहे व त्या पत्राच्या अनुषंगाने कामगारांना उपदान प्रदान करावे असे मे. शक्ती एन्टरप्राईजेसला आदेश केलेले आहेत. त्यानुसार मे. शक्ती एन्टरप्राईजेसनी जी माहिती जन माहिती अधिकारी यांना कळविली तीच माहिती अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेली आहे. महावितरणाची वर नमुद केल्याप्रमाणे उपदानाची रक्कम देण्याची जबाबदारी सुध्दा नाही परंतू प्रमुख्य नियोक्ता (Principle Employer) असल्यामुळे मे. शक्ती एन्टरप्राईजेसला तसे अर्जाप्रमाणे कळविण्यात आले होते. व ती माहिती किंवा जबाबदारी प्रमुख नियोक्ता (Principle Employer) ची सुध्दा नाही त्यांना माहिती उपलब्ध करुन झालेली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी प्रमुख्य नियोक्ता (Principle Employer) ची जबाबदारी आहे अशा पध्दतीने युक्तीवाद केला. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.993-994

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1232 नाग/2010 व अपील क्रमांक 1233 नाग/2010

श्री प्रशांत विठ्ठलराव दांडेकर
3/219 एच ब्लॉक, नंदनवन नासुप्र घरकुल योजना,
व्यंकटेश नगर, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शशिकांत हस्तक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
जलप्रदाय विभाग, महानगर पालिका नागपूर
धरमपेठ, डिग दवाखाण्याच्या मागे, नागपूर
2) श्री प्रदिप राजगिरे
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
जलप्रदाय विभाग, नेहरु नगर झोन क्र.5,
महानगर पालिका, नेहरु नगर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 21.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. परंतू अपीलकर्ता व गैरअर्जदार या दोन्हींच्या सहमतीने पुढील दि. 22.9.2010 ही तारीख देण्यात आली. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 1232 नाग/2010 व अपील क्रमांक 1233 नाग/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 20.3.2010 रोजी दोन स्वतंत्र अर्जांच्या माधमातून जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता जलप्रदाय विभाग, नेहरु नगर झोन क्र.5, महानगर पालिका, नेहरु नगर, नागपूर यांचेकडे ना.सु.प्र.नी फक्त अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या 753 गाळयासाठी टाकलेल्या 200 एम.एम. जलवाहीनी बाबत एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तसेच आपल्या झोन अंतर्गत केलेल्या 100/150एम.एम. व्यासाचा कुपनलिकेच्या कामाबाबत (वार्ड क्र.94,95,98,99,100,101,102,127,128,129,130,

131,132) या वार्डच्या संदर्भातील माहिती सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे दोन मद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. दोन्ही अर्जांच्या अनुषंगाने दि. 20.4.2010 रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 10.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. दोन्ही अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी मिळालेल्या माहितीच्या संदर्भात पुन्हा नव्याने माहिती मागितलेली दिसून येते. व त्यामुळे सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये दि. 24.5.2010 रोजी प्रथम अपीलाचे निर्णय दिलेले असून अर्जदाराने त्यास हव्या असलेल्या माहितीचे अवलोकन केले असता कार्यालयीन कागदपत्रे/रेकॉर्ड बाबत माहिती अधिका–यास अवगत करावे. व माहिती अधिका–याने ही माहिती 7 दिवसाचे आंत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू त्याचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद सादर केलेला आहे व त्यामध्ये त्यांना अपुर्ण माहिती मिळाली व दिशाभूल करणारी व खोटी माहिती मिळाली तसेच दि. 28.7.2010 रोजी रु. 106/– चा भरणा करण्यास सांगितले व माहिती प्रमाणित करुन दिली नव्हती ती नंतर त्यांनी प्रमाणित करुन दिली. मुद्या क्र. 3,6,7,8 ची माहिती दिली नाही. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी कागदपत्राच्या स्वरुपात व तक्त्यात माहिती भरुन मागितली होती ती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांचेकडे मुद्ये ही जन माहिती अधिकारी यांचे मत विचारणारे आहे व ते माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

4. तसेच अपीलकर्ता यांनी मिळालेल्या माहितीतून प्रथम अपीलात माहिती मागितली आहे ते अपेक्षित नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना सदरच्या योजनेच्या संदर्भामध्ये सविस्तर व तपशिलात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास त्यांनी दोन्ही योजनेच्या संदर्भामध्ये अभिलेख्याचे निरीक्षण करणे व त्यातून आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. जेणेकरुन पुन्हा पुन्हा माहिती मागण्याची आवश्यकता राहणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांची अपील क्रमांक 1232 नाग/2010 व अपील क्रमांक 1233 नाग/2010 ही दोन्ही अपीले मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना

कामकाजाच्या दिवसाची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी व त्या वेळेस उपस्थित होवून संबंधित अभिलेख्याचे निरीक्षण करावे. व निरीक्षणाअंती आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात. योग्य ते शुल्क प्रति पृष्ठ 2/– रु. प्रमाणे भरावे.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना लेखी कळविल्यानंतर अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर त्यांना संबंधित अभिलेखे निरीक्षणा करीता उपलब्ध करुन द्यावे. आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती प्रति पृष्ठ 2/– रु. घेवून पोच घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.996-998

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1302 नाग/2010**

श्री उमाशंकर पो. नामदेव
07, कमल–केशव प्लाझा, रामदासपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कि. म. कौसक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर अमरावती विभाग,
जुने सचिवालय, सिव्हील लाईन, नागपूर
2) श्री चंद्रकांत क्षिरसागर
जन माहिती अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर अमरावती विभाग,
जुने सचिवालय, सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर अमरावती विभाग यांचेकडे 1 एप्रिल 2009 ते 31 मार्च 2010पर्यंत शासन यादीमध्ये समाविष्ट 'क' वर्गाच्या वृत्तपत्रांच्या जाहिरातीचा तपशिल अशी एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.5.2010 नुसार संपूर्ण कागदपत्राच्या 284 पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येंक पृष्ठ 2/– रु. प्रमाणे एकुण रु. 568/– शासन जमा करण्या संदर्भात कार्यालयाचे पत्राने कळविण्यात आले. अपीलकर्ता यांना 10 मे 2010 रोजी कार्यालयात बालाविण्यात आले. अर्जदाराने सहमती दर्शविली परंतू अर्जदार 10 मे 2010 रोजी कार्यालयात येवून माहिती घेवून न जाता त्यांनी प्रथम अपील दाखल केले. व वेळ निघून गेली आहे व त्यामुळे मला सर्व माहिती आणि जमा केलेली रक्कम परत मिळावी अशी मागणी करुन कार्यालयातून निघून गेले. एकुण 284 पृष्ठांची माहिती अर्जदाराला देण्यासाठी कार्यालयाचा शिपाई यांच्या हस्ते दि. 17 मे 2010 रोजी सायंकाळी पाठविण्यात आले असता अर्जदाराचे कार्यालय बंद असल्याने तो परत आला. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 15.6.2010 रोजी देण्यात आला असून अर्जदाराला 17 मे 2010 रोजी माहिती घेवून जाण्या विषयी सांगितले. त्यानुसार अर्जदाराला माहिती देण्यासाठी केलेली कार्यवाही बरोबर आहे या कारणास्तव अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता आज गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी 10 मे 2010 रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला

आहे. त्यामुळे 4 मे 2010 रोजी त्यांना खर्चाचा भरणा करण्याकरीता कळविण्यात आले त्या दिवसापासून तर 10 मे 2010पर्यंतचा कालावधी हा अधिनियमाच्या कलम 7 (3) प्रमाणे 30 दिवसातून वगळुन मिळतो. व 16.5.2010 रोजी रविवार असल्याने अपीलकर्ता यांना 17 मे 2010 रोजी माहिती घेण्यास कळविण्यात आले होते. माहिती त्यांनी व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. दि. 5 मे 2010 ते दि. 10 मे 2010 हा सहा दिवसाचा काळ व 11 मे 2010 ते 16 मे 2010 हा सहा दिवसाचा कालावधी व त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे 16.5.2010 रोजी रविवार असल्याने 17 तारखेस बोलाविण्यात आले होते. म्हणजे माहिती त्यांना मुदतीत देण्याचा प्रयत्न केला होता त्यांनी माहिती न घेता त्याच दिवशी प्रथम अपील दाखल केले. कार्यालयातील संदेशवाहकाने माहिती देण्याचा प्रयत्न केला होता. त्यांचे कार्यालय बंद होते त्यामुळे माहिती देण्याची कार्यवाही ही मुदतीत केलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केली.

4. अपीलकर्ता यांनी सुध्दा अपील मेमोमध्ये दि. 10 मे 2010 रोजी रु. 568/- चा भरणा करण्यात आला पण माहिती ही दि. 16.5.2010 पर्यंत पुरविण्यात आली नाही व दि. 17.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले असे नमूद केलेले आहे. तसेच मागितलेली माहिती पुर्णपणे न देता अपुर्ण व दिशाभूल करणारी आहे असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्येच दि. 16.5. 2010 चा उल्लेख आहे व त्या दिवशी रविवार आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 15.5. 2010 ला माहिती घेण्यास बोलाविले ही त्यांची कृती योग्य आहे. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतली नाही त्यामुळे ती अपुर्ण व दिशाभूल करणारी आहे या म्हणण्यात काहीही तथ्य नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.992-993

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1300 नाग/2010

श्री जगन्नाथ बळवंतराव दलदले
अयोध्यानगर बस स्टॉप, न्यु सुभेदार गल्ली क्र.3,
नागपूर ता. जि. 440024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संजय पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय मौदा
ता. मौदा जि. नागपूर
2) श्री एस. एस. धोपटे
जन माहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र. 75
मोहाडी पोस्ट गोवरी
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र. 75 मोहाडी पोस्ट गोवरी ता. मौदा जि. नागपूर यांचेकडे सन 1977–78 च्या खस–यामध्ये दर्शविल्या प्रमाणे 20 आंब्याच्या झाडावरील वेगवेगळया खातेदारांचे हक्क दर्शविले नाहीत. तरी संबंधित हक्कदारांनी/वारसदारांनी त्यांचे आंब्यावरील हक्क सोडले आहेत काय? त्यांच्या हक्क सोडल्याच्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रत पुरवावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.6.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 9.7.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की सन 1977–78 च्या नमुना 7, 7अ व 13 मध्ये घेतलेल्या नोंदीप्रमाणे भूमापन क्रमांकामध्ये 20 आंब्याच्या झाडांची नोंद असून यावर खालीलप्रमाणे हक्क दर्शविण्यात आले. व त्यांनी 12 व्यक्तींची नावे वाचून

दाखविली परंतू त्यानंतर खातेदारांचे हक्क दाखविले नाही ती नोंद घेणे हे तलाठयाचे कर्तव्य असल्याने त्यांनी माहिती तलाठी यांना मागितली. परंतू तलाठी यांनी माहिती उपलब्ध करुन देतांना जशी आहे तशी दिली व ती भूमी अभिलेख खात्याकडून दुरुस्त करुन घ्यावी असे कळविले. परंतू भूमी अभिलेख खात्याने ती तलाठी किंवा तहसिलदार यांनीच नोंद घेतल्यानंतर भूमी अभिलेख खाते नोंद घेते असे त्यांना उत्तर दिले व त्यामुळे पुन्हा त्यांनी सदरचे अपील आयोगाकडे दाखल केले आहे. जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी आयोगापुढे असे सांगितले की माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिली आहे. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की त्याबाबत उपलब्ध झालेल्या माहितीवरुन अपीलकर्ता यांचेकडे असलेल्या पुराव्यावरुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडे दुरुस्ती करीता अपील घेणे आवश्यक आहे. व त्याबाबतचे निर्णय झाल्यानंतर पुन्हा नोंदी घेण्यात येतील. माहितीच्या अधिकारात माहिती जशी आहे तशीच उपलब्ध करुन दिली जाते व त्यामुळे अपीलकर्ता यांना तसे कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास विनंती आहे.

4. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जी कार्यपध्दती सांगितली त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी कार्यवाही करावी व माहिती मात्र त्यांना जशी आहे तशी उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.995-996

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1301 नाग/2010**

श्री विठठलराम रामलाल डोंगरे
बी 21–167, हुडको क्वार्टर, राणी दुर्गावती नगर
नागपूर ता. जि. नागपूर 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी लि.,
सिव्हील लाईन डिव्हीजन गड्डीगोदाम, कामठी रोड, नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी लि.,
लष्करीबाग सबडिव्हीजन, कामठी रोड,
शारदा चौक, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.9.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.9.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी लि., यांचेकडे नामांतरणासाठी केलेला अर्ज दि. 19.11.2008 च्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी दि. 20. 9.2010 रोजी घेण्यात आली असून अर्जदाराने सुनावणी दरम्यान मान्य केले की त्यांना कंपनीच्या कामा संबंधात व अधिकारी बाबत कुठलाही उजर किंवा आक्षेप नाही. सुनावणीस श्री विठठलराम रामलाल डोंगरे तर्फे दिलीप एन. घोडे हे हजर होते असे दिसून येते. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री घोडे यांचे समाधान झाले असे सांगितल्यामुळे प्रथम अपील हे खारीज करण्यात आले. परंतू तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

3. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.7.2010 च्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती दिलेली नव्हती हे दिसून येते. दि. 10.10.2010 च्या अर्जाप्रमाणे प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी घेतलेली नव्हती. मात्र आयोगाचे कार्यालयातून दि. 13.9.2010 रोजी नोटिस निर्गमित केल्यानंतर मात्र त्यांनी दि. 20.9.2010 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली. याचा अर्थ महावितरणाचे अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी बद्दल उदासीन आहेत असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. जेणेकरुन महावितरणाचे अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या

अर्जाच्या प्रक्रियेबद्यल मुदतीत निर्णय देतील. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगाचे कार्यालयातून नोटिस निर्गमित केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेतली. मात्र निर्णय दिलेलाच नाही व अर्जदार किंवा अपीलकर्ता प्रत्यक्षात उपस्थित नसून त्रयस्थ व्यक्ती श्री घोडे यांचे समाधान झाले असे आयोगापुढे सांगितले. परंतू घोडे हे अपीलकर्ता नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 7.7.2010 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत लेखी माहिति विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचे दि. 7.7.2010 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 1000/– ची शास्ती कां लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ‘‘0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016’1)’’ मध्ये जमा करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.999-1000

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1251 नाग/2010

श्री महेश चैतराम पाली
प्लॉट क्र. 366, धरमपेठ टांगा स्टॅंड, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जे. एम. बेंडे
जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.2
नागपूर
प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर होते. परंतू सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची विनंती केलेली असल्यामुळे सुनावणी दि. 24.9.2010 ला ठेवण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी सदरच्या तारखेला घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर भूमापन अधिकारी क्र.2 यांचेकडे श्रीमती किरण मलय दत्ता यांच्या संदर्भात तसेच कार्यालयीन कामकाजाबद्यल एकुण 5 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.5.2010 रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली तसेच मुद्या क्र.4 च्या संदर्भामध्ये रु.361005/— इतका शासकीय फी चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी किंवा विनासांक्षांकित प्रतिपेज रु. 2 प्रमाणे रक्कम रु. 48134/— इतक्या शासकीय फी चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे व 30 दिवसाचे आत माहितीचा पुरवठा न केल्यामुळे दि. 2.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपीलात कोर्ट फी स्टॅम्प हा लावलेला नसल्यामुळे त्यांना दि. 11.6.2010 रोजी नागपूर कार्यालयाकडे संपर्क साधून नियमानुसार फी भरुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली तर नाहीच परंतू 20 व्या दिवशी रु.361005/- किंवा रु. 48134/- एवढया अतिरिक्त फी चा भरणा करावा असे कळविले. परंतू सदरचे पत्र हे त्यांना मुदतीनंतर मिळालेले आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्यात यावी अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केली. जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली त्यात कोणत्याही निश्चित असे मालमत्तेचे वर्णन मुद्दा क्र.4 मध्ये केलेले नाही दि. 16.1.2003 पासून संपूर्ण कार्यालयामध्ये न झालेले फेरफार अशा प्रकारची माहिती मागितलेली आहे. संपूर्ण माहिती ही उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने ती माहिती काढून ठेवण्याच्या दृष्टिने व त्याकरीता खर्चाची रक्कम कळविण्याकरीता विलंब झालेला आहे परंतू तरी सुध्दा त्यांना मुदतीत खर्च कळविलेला आहे. नगर भूमापन कार्यालयातील आखिव पत्रिका किंवा फेरफाराची माहिती ही नियमाप्रमाणे फी ची आकारणी करुन उपलब्ध करुन देण्यास रु.361005/- एवढा खर्च येणार आहे व शासकीय खर्च न करता उपलब्ध खर्च ज्यास प्रतिपेज रु. 2/- प्रमाणे रक्कम रु. 48134/- हा खर्च येणार आहे व त्यावरुनच अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या स्वरुपाचा अंदाज येतो. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पुन्हा कार्यालयास दैनंदिन कामकाज बाजुला ठेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचे किंवा छायांकित प्रती देण्याचे काम करावे लागेल व तसे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांनी निश्चित अशी माहिती मागितल्यास ती देण्यास कोणतीही अडचण नाही तसेच माहिती उपलब्ध करुन न देण्याचे कोणतेही कारण नाही. त्यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती अतिशय मोघम स्वरुपात आहे निश्चित कोणत्याही मालमत्तेचे वर्णन नाही. दि. 16.1.2003 पासून आज पावेतो किती प्लॉट धारकाने फेरफार बदल अर्ज केला, कायद्याप्रमाणे तारखेप्रमाणे किती अर्ज आले त्यांची नावांची यादी. नियमाप्रमाणे सिरीयल नंबर आवक क्रमांक व तारखेसह अर्जाची माहिती प्रमाणे फेरफार करण्यात आले. इत्यादी पुन्हा माहिती मागितलेली दिसून येते. व त्यामुळेच जन माहिती अधिकारी यांनी कळविलेला खर्च योग्य आहे असे दिसून येते. प्रश्न विलंबाचा आहे तर 29 व्या दिवशी कळविण्याचे कारण या सर्व माहितीचा अंदाज घ्यावयाचा होता. व त्यामुळेच दैनंदिन कामकाज करुन माहितीचा अंदाज घेण्यास विलंब लागलेला आहे. तसेही अधिनियमाचे कलम 7 (3) प्रमाणे खर्चाच्या भरण्याचे पत्र दिल्यापासून खर्चाचा भरणा करेपर्यंतचा कालावधी हा 30 दिवसाचे कालावधीच्या परीगणनेमधून वगळावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुदतीत खर्चाचा भरणा करावा हे कळविलेले

असल्यामुळे उलट त्यांनी खर्च भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. अन्यथा मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निर्णय घेवून आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधील माहितीचा अधिकार या संज्ञेप्रमाणे घेणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये नस्तीचे निरीक्षण करुन त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती प्रतिपेज रु. 2/– प्रमाणे खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घ्याव्या.
2) अपीलकर्ता हजर झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संबंधित नस्ती निरीक्षणा करीता उपलब्ध करुन द्याव्या.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.996-998

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1252 नाग/2010

श्री गुरुदत्त जोगेन्द्रजी मेश्राम
31 झाडे लेआऊट जयताळा, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर ,
धनवटे चेंबर्स, सिताबर्डी नागपूर
2) श्री धाबेराव
जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
185 आयुर्वेदिक लेआऊट, भांडे प्लॉट चौक,
उमरेड रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते व उत्तरवादी हजर होते. परंतू सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची विनंती केलेली असल्यामुळे सुनावणी दि. 24.9.2010 ला ठेवण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी सदरच्या तारखेला घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था तथा सावकाराचे सहाय्यक निबंधक यांचेकडे शिक्षक सहकारी बॅकेच्या संदर्भातील लोन प्रकरणाबाबत एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.4.2010 रोजी अर्जातील नमुना क्र. 1 ते 7 क्रमांकाची माहिती या कार्यालयातीरल बाबींशी संबंधित नसल्याने आपला दि. 13.4.2010 चा प्राप्त झालेला अर्ज या कार्यालयाचे स्तरावर नस्तीबध्द करण्यात येत आहे. व शिक्षक सहकारी बॅकेकडे तो वर्ग करण्यात येत आहे. बॅकेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे

कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 19.6.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.7.2010 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1000-1001

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1249 नाग/2010

श्री केवलराम गजानन पटले
मु. पो. अर्जुनी
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. चंदावार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया
2) श्री वाय. एच. क्षिरसागर
जन माहिती अधिकारी तथा तलाठी सा.क्र.1,
अर्जुनी पोस्ट अर्जुनी
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.8.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 25.8.2010 रोजी नोटीस काढून दि. 16.9.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर होते. परंतू सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची विनंती केलेली असल्यामुळे सुनावणी दि. 24.9.2010 ला ठेवण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी सदरच्या तारखेला घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे सा.क्र.1 भू.क्र.337 बद्यल खातें क. 121 बदल करुन त्या भूमापन क्र. 337 ला नवीन खाते क्र. 357 देण्यात आले कारणे कोणती याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच त्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती द्याव्या अशीही मागणी केली आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 10.3.2010 रोजी माहिती घेवून जाण्याकरीता व खर्चाचा भरणा करण्याकरीता कोतावाला बरोबर नोटिस हस्तबटवाडयाने पाठविली होती. परंतू अपीलकर्ता यांनी ती नोटिस घेण्यास नकार दिला. अपीलकर्ता यांनी दि. 1.4.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.5.2010 रोजी देण्यात आला असून त्यांना वस्तुस्थिती कळविण्यात आलेलीदिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी पुन्हा दशरथ आत्माराम, इसराम आत्माराम यांच्या नावाची नोंद कोणत्या दस्तऐवजाच्या आधारावर करण्यात आली त्याबद्यलची माहिती द्यावी असे नमूद केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की मला हवी ती माहिती उपलब्ध करुन देत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 27.2.2010 रोजी कागदपत्रे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहेत. व ही बाब अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केली. त्यामुळे पुन्हा त्यांना कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे याबद्यल त्यांना आयोगापुढे काहीही सांगता आलेले नाही. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दशरथ आत्माराम व इसराम आत्माराम यांचे नावे सदर गटातून काढण्यात येते आपण मंडळ अधिकारी तथा जन माहिती अधिकारी परसवाडा तहसिल कार्यालय तिरोडा यांचेकडे रीतसर नोंदणी ऐवजाचे दस्तऐवज सादर करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करणे सोयीचे होईल असे कळविलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना कार्यवाहीची अपेक्षा आहे. व माहितीच्या अधिकारामध्ये माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात जशी आहे तशी उपलब्ध होते कोणतीही कार्यवाही करुन मागण्याची तरतुद दिसून येत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1003-1004

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1065 औरंगाबाद/2010**

श्री निवृत्ती सोपान ढोले
शारदा कॉलनी, भुसावळ रोड,
मु. पो. ता. बोदवड जि. जळगाव ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती बोदवड
ता. बोदवड जि. जळगाव
2) श्री संजय बैरागी
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत बोदवड
ता. बोदवड जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.9.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. परंतू सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणीची तारीख पुढे ढकलण्यात येवून ती दि. 29.9.2010 रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी अपेक्षित असलेली माहिती मिळाली असून अपील निकाली काढण्याची विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येते.

1) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1006-

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1015 नाग/2010**

श्री रामदास एम. मासुरकर
हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
सिव्हील लाईन, नागपूर
2) श्री जे. टी. रघुवंशी
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
सिव्हील लाईन, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 31.8.2010, दि. 8.9.2010 रोजी ठेवण्यात आलेली होती. परंतू त्या तारखांना सुनावणी न झाल्यामुळे सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 22.9.2010 रोजी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे हिवरी ईडब्लूएस–105/10 गाळयांचा रेकॉर्ड शोधण्याच्या संदर्भात एकुण 6 मुद्यांवर कार्यालयात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू सदरचे अपील हे मुदतबाहय असल्यामुळे खारीज करण्यात आलेले होते. अपीलकर्ता यांनी तत्पूर्वीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व तसे अपीलकर्ता यांना दि. 5.12.2008 रोजी खर्चाचा भरणा रु. 903/– भरण्यास कळविण्यात आलेले होते. त्यामुळेच तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन

येतात. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. परंतू माहितीच्या अर्जानंतर 5 महिन्यानी खर्चाचा भरणा करणेबाबत कळविले असल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू ते सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे रु. 500/– ची शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 500/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे कडून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1006-1007

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1068 औरंगाबाद/2010, अपील कमांक 1069 औरंगाबाद/2010 व अपील कमांक 1070 औरंगाबाद/2010.**

श्री दिलीप वामन पाटील
मु. पो. कसबापिंप्री
ता. जामनेर जि. जळगाव ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**अपील कमांक 1068 औरंगाबाद/2010, अपील कमांक 1069 औरंगाबाद/2010**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती जामनेर
ता. जामनेर जि. जळगाव
2) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कसबापिंप्री
ता. जामनेर जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**अपील कमांक 1070 औरंगाबाद/2010**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती जामनेर
ता. जामनेर जि. जळगाव
2) जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (गा.पं.)
पंचायत समिती जामनेर
ता. जामनेर जि. जळगाव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. परंतू दि. 23.8.2010 रोजी व दि. 26.8.2010 रोजी सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी होवू शकली नसल्यामुळे

दि. 29.9.2010 रोजी तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे दोन अर्जांच्या माध्यमातून कसबापिंप्री गावाची फेरआकारणी (मोजमाप) सन 1999 ते 2003, 1999 ते 2005, 1999 ते 2006, 2006 ते 2009, 2006 ते 2009/10 व 1999 ते 2004 च्या वरील सालात ज्या ज्या वर्षी फेरफार झालेला आहे त्या वर्षीच्या फेरफार आकारणीच्या संपुर्ण गावाच्या पंचनामा प्रती सहिशिक्यानिशी मिळाव्या. जागा क्र. 133 व 173 नमुना नं. 8 चे उतारे क्षेत्रफळ चौ. फुट/चौ व चर्तुसिःमा सहित सत्यप्रती मिळाव्या 2. दि. 14.11.09 च्या अर्जावर काय विचार करण्यात आला यांची माहिति मिळावी, ठराव सहित जर ग्रा.पं. घ.नं.271/2 व 185 हया जागा मृत्यू पत्राने (1) श्री दिलीप वामन पाटील (2) सौ.भागाबाई मगन तेली यांच्या नावावर लावण्यात आल्या असतील तर नं.नं.8 चे उतारे मिळावे. चतुसिमा सहित (3) सन 2000 मध्ये ग्रा.पं.मार्फत झालेल्या मोजमाप तक्रार अर्ज श्री अरुण पाटील यांच्या अर्जाचे झेरॉक्स प्रत व घर क्र. 33,34,35,36 चे उतारे, चतुसिमा व 2005 साली झालेल्या फेरआकारणीच्या पंचनाम्याची प्रत साही शिक्यानिशी मिळाव्या जमाखर्चाच्या बाबत ठराव क्र. 2 च्या नावावर झालेल्या जमा व खर्च ची ठराव प्रत दि. 19 एप्रिल 2005 ते 20 जाने. 2010पर्यंत सत्यप्रती.

4. दि. 19.3.08 मासिक सभा ठराव नं. 12 व 13

5. दि. 26.1.2010 ग्रामसभा ठराव नं. 3 ची प्रोसिडींग नक्कल किती सभासद हजर होते अध्यक्षाचे नाव सहिशिक्यानिशी मिळावी

6. दि. 22.1.2010 च्या अर्जावर काय विचार करण्यात आला याची माहिती मिळावी ठरावासहित (2) घर जुना नं. 272 खलील रशिद जमादार व जलील रशिद जमादार यांच्या नावाचे नवीन नंबर न.नं.8 चे उतारे चर्तुसिमा सहित मिळावे (3) ग्रामपंचायतने घर बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे का. खलील व जलील यांना तशी लेखी स्वरुपात माहिती मिळावी. कोर्टाच्या कामी.

7. न.नं. 6 अ, व न.नं. 6 ब (वर्गिकरण रजिस्टर) ची सन 21 एप्रिल 2005 ते 29 जानेवारी 2010पर्यंतच्या कालावधीची सत्यप्रत

8. जनरल अकाऊंटची किर्द (न.नं. 5) ची दि. 1 एप्रिल 06 ते 29 जानेवारी 2010 तसेच (न.नं. 15) व्हावचर सह सत्यप्रती

9. सन 1 जानेवारी 2005 ते आजपर्यंत म्हणजेच 29 जानेवारी 2010पर्यंत सर्व महिला ग्रामसभाची प्रोसिडिंग व उपस्थिती पटाची सत्यप्रती मिळाव्या

10. सन 1 जानेवारी 2005 ते आजपर्यंत म्हणजेच 29 जानेवारी 2010पर्यंत संपुर्ण झालेल्या कसबापिंप्री गावातील कामाची एम.बी.झेरॉक्स. अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दुस–या अर्जांच्या माध्यमातून फेरआकारणीच्या संदर्भात इतर दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

अनुक्रमे दि. 12.3.2010 व दि. 2.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 26.3.2010 रोजी देण्यात आला असून मागणी केलेली माहिती 10 दिवसाचे आत रजिस्टर पोस्टाने देवून अहवाल कार्यालयात सादर करावा असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना जी माहिती उपलब्ध झाली ती विलंबाने उपलब्ध झाली. व अपूर्ण व चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी प्रतिज्ञापत्र सुध्दा सादर केलेले आहे. परंतू त्या लेखी प्रतिज्ञापत्रामध्ये अपूर्ण व खोटी माहिती ही कशा प्रकारे दिली त्याबद्यलचे कोणतेही स्पष्टिकरण दिलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दोन्ही अर्जातील माहिती किचकट, गुंतागुंतीची विस्तृत व जुनी असल्यामुळे अर्जदाराला विनंती करुन ग्रामपंचातमध्ये दप्तर पाहणी करुन आवश्यक माहितीचे झेरॉक्स घेवून जावे अशी तोंडी विनंती संबंधितास केली होती. त्यातही त्यांची आई आजारी असल्यामुळे दि. 11.3.2010 व दि. 15.3.2010 या दरम्यान प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे हजर राहता आले नाही मात्र दि. 26.3.2010 रोजी हजर झाले व प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे संबंधित अपीलकर्त्यास दि. 6.4.2010 रोजी स्पिड पोस्टने माहिती दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी सन 2000 पासून अशा प्रकारच्या माहित्या आणि त्याच त्याच माहित्यांचे अर्ज पुन्हा पुन्हा माहिती अधिकाराद्वारे केलेले आहे तसेच त्यांना त्यांच्या मनानुसारच ते सांगतील तशीच माहिती त्यांना पाहिजे आहे. त्यांच्या मनाप्रमाणे त्यांना माहिती देवू शकत नाही अशा प्रकारे ग्रा.पं.स हैरान करीत आहेत. माहिती दिल्यावर सुध्दा त्यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे. माहिती दिल्याची पोच पावती सुध्दा आयोगाकडे दाखल केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे तोंडी युक्तीवाद करतांना पुन्हा असेही सांगितले की अपीलकर्ता यांच्या वडीलांकडे रु. 1420/– ची ऑडीट रिकव्हरी आहे व त्याकरीता बोजा बसविला आहे. तें अतिक्रमण करुन शेती करतात. गट नं. 201 चा शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. अतिक्रमणा करीता त्यांना नोटिस सुध्दा देण्यात आलेली आहे या सर्व बाबींच्या संदर्भात ग्रा.पं.नी त्यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही करु नये या करीता ते सन 2000 पासून वारंवार माहिती मागत असतात. त्यांच्याकडे संडास नाही दुस–याचे संडास दाखवितात असेही त्यांनी युक्तीवादात सांगितले. व माहिती दिली तरी तीच माहिती पुन्हा पुन्हा मागतात. माहिती प्रथम अपीलाच्या आदेशा नंतर दिली हे ते मान्य करतात. परंतू तीच तीच माहिती किती वेळा काढून देणार. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा युक्तीवादात असे सांगितले की अपीलकर्ता यांचे अनेक माहितीचे अर्ज आहेत. पं. स. कडे सुध्दा अनेक माहितीचे अर्ज आहेत. व नेमकी विशिष्ट माहिती मागत नाहीत. असे असले तरी प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती

विलंबाने उपलब्ध झालेली आहे. व चुकीची व अपुर्ण मिळाली आहे. या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांना शास्ती लादण्यात यावे.

4. परंतू अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती अतिशय जुनी माहिती आहे. दोन्ही अर्जात तीच तीच माहिती मागितलेली दिसून येते. व त्यावरुन जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

5. अपील क्रमांक 1070 औरंगाबाद/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी खंड विकास अधिकारी पंचायत समिती जामनेर यांचे कार्यालयामध्ये पंचायत समिती विस्तार अधिकारी मौजा कसबापिंप्री येथील 1 एप्रिल 2009 ते 22.12.2009पर्यंत करण्यात आलेल्या सर्व तक्रारीच्या चौकशी फाईलची झेरॉक्स प्रती मिळाव्या अशी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 17.2.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.4.2010 रोजी देण्यात आला असून अर्जदारास दि. 17.4.2010 रोजी सर्व माहिती एकुण 307 प्रती पोस्टाने पाठविलेल्या आहेत. अपीलकर्ता यांना माहिती मिळाल्याची पोस्टाची पोच पावती सुध्दा दाखल केलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व मिळालेली माहिती ही विलंबाने मिळाली अपुर्ण खोटी व दिशाभूल करणारी मिळाली असे प्रतिज्ञापत्र आयोगापुढे सादर केलेले आहे.

6. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की आतापर्यंत त्यांनी पंचायत समिती कसबापिंप्री ग्राम पंचायतच्या संदर्भामध्ये अनेक तक्रारी केलेल्या आहेत. व त्या अनेक तक्रारीच्या माध्यमातून चौकशी मागितली परंतू कोणत्याही तक्रारीची चौकशी होत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या तक्रारीची चौकशी ही वेळोवेळी केलेली असते परंतू त्या तक्रारीमध्ये काहीही तथ्य दिसून येत नाही. व त्यामुळे त्या तक्रारीच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जुनी व विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे त्या सर्व तक्रारींचा शोध घेवून माहिती देण्यास विलंब झालेला आहे. अपीलकर्ता यांचे माहितीच्या अधिकारात अनेक अर्ज पंचायत समितीकडे दाखल होतात. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता ती विस्तृत स्वरुपात आहे व जुनी आहे हे निश्चित. व त्यामुळे अशा प्रकारची माहिती दैनंदिन कामकाज सांभाळून शोधून काढून देणे हे अतिशय कालावधीचा अपव्यय करणारे आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती मिळालेली आहे त्या संदर्भात त्यांनी अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असेच म्हटलेले आहे. परंतू त्याबाबत कोणतेही लेखी स्पष्टिकरण दिलेले नाही. त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा दिशाभूल करणारी व अपूर्णच्या संदर्भात मुद्येनिहाय कोणतेही स्पष्टिकरण नाही. व त्यामुळे माहिती उपलब्ध झालेली असल्याच्या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक 1068 औरंगाबाद/2010, अपील क्रमांक 1069 औरंगाबाद/2010 व अपील क्रमांक 1070 औरंगाबाद/2010 ही तीनही अपीले खारीज करण्यात येतात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.
कॅम्प जळगाव

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1073 औरंगाबाद/2010

श्री निळकंठ दगडू पाटील
रा. बिलखेडा पो. जांभोरा
ता. धरणगाव जि. जळगांव ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख एरंडोल
ता. एरंडोल जि. जळगांव ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.9.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.5.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.7.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.8.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी झाली नाही. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 29.9.2010 रोजी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख एरंडोल यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मे. प्रांत अधिकारी सो.अ.भाग यांचेकडील हु.नं.L.B.P.S.R.16/56 दि. 25.2.1957 रोजीच्या पत्रान्वये गावठाण जागेवरील अनुक्रमे 1 ते 16पर्यंतच्या फाईनल प्लॉटांची मोजणी करुन सदरचे फाईनल प्लॉट एकास–एक अशा पध्दतीने सनदीनुसार नागरिकांना देण्यात आलेले आहेत काय– सदरचे फाईनल प्लॉट सनदीनुसार नागरिकांना देण्यात आलेले असतील तर अनुक्रमे 1 ते 16पर्यंतच्या सनदी सर्टीफाईड नकलांची माहिती व सदरच्या गावठाण जागेवर सुनिश्चित केलेल्या 1 ते 16पर्यंतच्या फाईनल प्लॉटांच्या नकाशाची सर्टीफाईड नकलांची माहिती मिळावी.

2. सदरच्या गावठाण जागेवरील 1 ते 16पर्यंतच्या फाईनल प्लॉटांची मोजणी फलक मापन पध्दतीने करण्यात आलेली आहे काय याबाबतची माहिती व सदरच्या फाईनल

प्लॉटांची मोजणी फलक मापन पध्दतीने करण्यात आलेली नसेल तर सदर फलक मापन पध्दतीचा वापर का करण्यात आलेले नाही. याबाबतची माहिती मिळावी.

3. गावठाण जागेवरील 1 ते 16पर्यंतच्या फाईनल प्लॉटांचे एकुण क्षेत्रफळ किती आहे व सदरच्या नागरिकांना प्लॉट किती x किती मोजणी करुन (सदरचे प्लॉट) अदा करण्यात आलेले आहेत. याबाबतची माहिती मिळावी.

4. फाईनल प्लॉट नं.5 च्या शेवटच्या कोप–यापासुन मारोती मंदीराचे अंतर किती फुटावर आहे याबाबतची माहिती मिळावी. सदरच्या माहितीचा कालावधी हा 1957 ते आजपावेतो आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 15.4.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 7.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.6.2010 रोजी देण्यात आला असून अर्जदार यांनी मागणी केलेल्या पत्रा नुसार व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख एरंडोल यांनी दिलेल्या दि. 16.4.2010 च्या पत्रा नुसार अर्जदार यांनी 1 ते 16 प्लॉटची मोजणी फी भरणा करावी व अर्जदार यांनी मोजणी फी भरणा केल्यानंतर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख एरंडोल यांनी नियमानुसार मोजणी प्रकरणात मोजणी कार्यवाही करावयाची आहे व अशा प्रकारे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आले. त्यावरुन अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या अर्जात मागितल्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना त्यांच्या प्लॉटची मोजणी करुन नकाशा दिलेला आहे. त्यांना इतर प्लॉटची मोजणी फी भरावयाची नाही. मात्र माहितीच्या अधिकारामध्ये त्यांना इतर 16 प्लॉटची मोजणी करुन सर्व प्लॉटचे कागदात्रे व नकाशे उपलब्ध करुन द्यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. परंतू अशा प्रकारे कार्यवाही करुन माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. कोणत्याही जमीनीची मोजणी करुन मिळकत पत्रिका किंवा नकाशे उपलब्ध करुन देण्या करीता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या अंतर्गत नियम केलेले आहेत व त्या त्या प्रकिये करीता फी सुध्दा ठरविण्यात आलेली आहे व सदरची प्रक्रिया ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे होवू शकत नाही. अपीलकर्ता यांना संपूर्ण 16 प्लॉटच्या संदर्भात मोजणी करुन नकाशे, क्षेत्रफळ इत्यादी माहिती हवी असेल तर त्यांना वर नमुद केल्याप्रमाणे विभागाच्या नियमाच्या अनुषंगाने फी भरुनच नकाशे व इतर कागदपत्रे उपलब्ध होवू शकतील. अपीलकर्ता यांना वारंवार ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. परंतू त्यांचा आग्रह हा माहितीचा अधिकार या कायद्याप्रमाणेच माहिती मिळावी असा आहे.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जी माहिती कार्यालयामध्ये अर्ज करते वेळेस कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असते ती माहिती उपलब्ध होवू शकते. कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले निर्णय हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले निर्णय हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**
**कॅम्प जळगांव**

जा.क्र.————————— दि.................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**